## बिसेन डेन्टल केअर




डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक १८ | बुधवार,दि.०९ एप्रिल २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# शाळांमधील लिपिक,ग्रंथपाल नियुक्तीचा मार्ग मोकळा

### विभागात ८०० पदांसाठी भरती,२१ वर्षांनंतर नियमित नियुक्त्या,८०% पद भरतीस मान्यता

**गोंदिया–** मान्यताप्राप्त खासगी अंशतः आणि पूर्ण अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये कनिष्ठ लिपिक, ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यकांची १०० टक्के पदे भरण्यास अखेर ग्रीन सिग्नल दिला. ज्यामध्ये अनुकंपा नियुक्तीचा समावेश आहे. शिक्षक भरतीच्या धर्तीवर, एकूण रिक्त पदांपैकी ८० टक्के पदे भरण्याची अट शिक्षकेतर पदांसाठी देखील लागू असेल. या निर्णयामुळे शिक्षकेतर पदांवर भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यभरात ५ हजारांहून अधिक पदे भरली जातील. यामध्ये नागपूर विभागातील तब्बल सुमारे ८०० पदांचा समावेश आहे.



राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अंशतः, पूर्ण अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित रचना लागू करण्यात आली आहे. शैक्षणिकेतर संवर्गात, विद्यार्थ्यांच्या संख्येच्या आधारावर कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, मुख्य लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यक नियमित पदांना मान्यता देण्यात आली आहे. वर्ग चतुर्थ कर्मचाऱ्यांचे पद रद्द करण्यात आले असून त्याऐवजी भत्ता देण्यात आला आहे. नियमित नियुक्तीवर काम करणारे वर्ग चतुर्थ शिक्षकेतर कर्मचारी निवृत्तीपर्यंत सेवेत राहतील.

मनुष्यबळाची कमतरता असलेल्या शाळांसाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. ता`उपयुक्त आहे. यामुळे भविष्यात शिक्षकांवरील अतिरिक्त कामाचा भार कमी होईल. शाळांची स्थितीही सुधारेल. एका अंदाजानुसार, विभागात सुमारे ८०० पदांसाठी भरती होऊ शकते अशी माहिती नागपूर विभागीय शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांनी दिली आहे.

**शिक्षकांना दिलासा, परिस्थितीत होणार सुधारणा**

शाळांमध्ये कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे गेल्या अनेक वर्षापासून शाळांना भरतीसाठी संघर्ष करावा लागला. मनुष्यबळा अभावी शिक्षकांना सगळीच कामे करावी लागत होती. यामुळे अध्यापन आणि शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारी निर्णयात शिक्षकेतर संवर्गातील काही पदांसाठी नियुक्ती कोट्यात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भरती प्रक्रियेबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात तब्बल २१ वर्षांनी ही नियुक्ती होणार आहे.

# शेतकऱ्यांचा विज वितरण कंपनीवर ठिय्या आंदोलन

गोरेगाव:–रब्बी धान पीकास नियमित पाणी पुरेल यासाठी १२ तास वीज पुरवठा करण्यात यावा या मागणीला घेऊन मंगळवार (ता ०८) दुपारी बारा वाजता सोनी बोटे दवडीपार झांजिया मोहगाव सर्वाटोला येथील जवळपास २०० शेतकऱ्यांनी वीज वितरण कार्यालय गोरेगाव येथे ठिय्या आंदोलन केले व दिवसा १२ तास वीज पुरवठा करण्यात यावा या आशयाचे निवेदन उपकार्यकारी अभियंता विवेक गजभिये यांना देण्यात आले.

सोनी बोटे दवडीपार झांजिया मोहगाव सर्वाटोला या ग्रामीण भागात ७ एप्रिलपासून रब्बी भात पीकास पाणी देण्यासाठी विज पुरवठा रात्री १० वाजता पासून ते पहाटे चार वाजेपर्यंत म्हणजे ८ तास करण्यात येते. रात्री भारनियमन जास्त असल्यामुळे फेस, डीओ जात राहतो. यामुळे अनेक तास विद्युत पुरवठा बंद राहते. त्यामुळे शेतीला पुरेशी पाणी मिळू शकत नाही. आणि रात्री बेरात्री शेतात जाणे हे धोकादायक आहे त्यामुळे एप्रिल मे महिन्यात दिवसा १२ तास वीज पुरवठा करण्यात यावा अशी मागणी आंदोलन कर्त्या शेतकऱ्यांनी केली आहे

यावेळी पंचायत समिती सदस्य किशोर पारधी, मोहगाव चे उपसरपंच कमलेश रहांगडाले, सुनील साखरे, दवडीपारचे सरपंच बुगलाल कटरे, झांजिया सरपंच अरुण बिसेन, प्रेमलाल शहारे,राधेश्याम सोनवणे, सतीश हटवार सिताराम पटले तसेच मोठ्या संख्येत शेतकरी बांधव उपस्थित होते.



## आमगाव नगरपरिषदेचा दर्जा रद्द;इतर सात गावे पुन्हा ग्रामपंचायतीकडे

### उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य शासनाची कारवाई

गोंदिया–जिल्ह्यातील आमगाव नगरपरिषदेच्या स्थापनेवर राज्य शासनाने अखेर शिक्कामोर्तब करत ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. २०१७ मध्ये स्थापन झालेल्या या नगरपरिषदेचा दर्जा रद्द करून, संपूर्ण क्षेत्र पुन्हा ग्रामपंचायत व नगरपंचायत व्यवस्थेखाली आणण्याची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने २८ मार्च २०२५ रोजी प्रकाशित केली.गोंदिया जिल्ह्यातील आमगाव नगरपरिषद विखंडित करून संबंधित क्षेत्राचा दर्जा रद्द करण्यात आला असून, त्या जागी नव्याने "नगरपंचायत' व "ग्रामपंचायत' अशी पुनर्रचना करण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ६(१)(ड) आणि महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ अंतर्गत शासनाने हा निर्णय घेतला.




२०१७ मध्ये आमगाव नगरपरिषदेची स्थापना करण्यात आली होती. मात्र, या स्थापनेविरोधात नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र. ५९००/२०१७ मध्ये उच्च न्यायालयाने २८ नोव्हेंबर २०१७ रोजी महत्त्वपूर्ण आदेश दिला होता. त्यानंतर शासनाकडून या निर्णयावर पुनर्विचार सुरू करण्यात आला.

२८ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाने या संदर्भातील अधिसूचना जारी केली होती. विखंडनाचा हेतू स्पष्ट करत प्रस्तावित बदलांवर जनतेकडून हरकती व आक्षेप मागवण्यात आले होते. त्या आक्षेपांवर सखोल विचार केल्यानंतर शासनाने अंतिम निर्णय घेतला.

या निर्णयानुसार, आमगाव नगरपरिषदेचा समावेश असलेले क्षेत्र आता नगरपरिषदेच्या कक्षेबाहेर राहणार आहे. त्या जागी "आमगाव नगरपंचायत' अस्तित्वात येणार असून, इतर सात गावे स्वतंत्र "ग्रामपंचायत' म्हणून कार्यरत राहतील.

राज्य शासनाने स्पष्ट केले आहे की, या विखंडनासंदर्भात स्थानिक नागरिकांना कोणताही आक्षेप असल्यास, त्यांनी ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी.

हा निर्णय केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पातळीवर नव्हे, तर संपूर्ण गोंदिया जिल्ह्याच्या प्रशासकीय रचनेत मोठा टप्पा ठरणार आहे. प्रशासनाच्या पुनर्रचनेनंतर विकास आराखड्यांवर, निधीच्या वापरावर आणि स्थानिक स्वायत्ततेवर प्रत्यक्ष परिणाम होण्याची शक्यता असून, पुढील काळात या निर्णयाचे दूरगामी परिणाम दिसून येणार आहेत.

"शासनाच्या अधिसूचनेनुसार विखंडनाची प्रक्रिया ही कायद्याच्या चौकटीत पार पडत असून, यावर नागरिकांनी आक्षेप असल्यास त्यांनी दिलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी स्वरूपात आपली भूमिका मांडावी. नगरपरिषद प्रशासन शासनाच्या आदेशानुसार आवश्यक सहकार्य करण्यास बांधील आहे."

**– कु.करिश्मा वैद्य**
**मुख्याधिकारी न.प.आमगांव**

## राष्ट्रीय क्षयरोग नियत्रंण कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यात गोंदिया जिल्हा राज्यात अव्वल



**गोंदिया**:राष्ट्रिय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील ग्रामीण व शहरी भागात गोंदिया जिल्हा वर्ष २०२४ मध्ये क्षयरोग नियत्रंण कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यात राज्यात अव्वल ठरला आहे.राज्यातील सर्व जिल्ह्याचे केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशकानुसार क्षयरोग कार्यक्रम मध्ये केलेल्या कामानुसार रैंकिंग केले जाते. गोंदिया जिल्हा क्षयरोग विभागाने नव्वद गुण प्राप्त करुन राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत विविध १४ निकषावरून कामांचे मूल्यमापन करण्यात आले.

७ एप्रिल जागतिक आरोग्य दिनानिमित्त मुंबई यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित महाराष्ट्र आरोग्य सन्मान कार्यक्रमात क्षयरोग कार्यक्षेत्रात उल्लेखनीय कामाबद्दल प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांच्या क्षयरोग पथकाने स्विकारले.यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आरोग्य सचिव डॉ.निपुण विनायक, सार्वजनिक आरोग्य सचिव वीरेंद्र सिंह,राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक अमोगोथू नायक उपस्थित होते.सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत जिल्हा क्षयरोग विभागाला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

पारितोषिक स्विकारणार्या पथकाच जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार,वैद्यकीय अधिकारी डॉ.वेदप्रकाश चौरागडे व डॉ.देवदास चांदेवार,जिल्हा डी.आर.टी.बी.एचआयव्ही समन्वयक चंद्रकांत भुजाडे,वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक पवन वासनिक व भोजेंन्द्रकुमार बोपचे,वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक संजय भगवतकर व राजु मेश्राम ,प्रयोगशाळा तंत्रज्ञ अमित मंडल यांचा समावेश होता.

## बड्या पक्षाची मान्यता रद्द करण्याची न्यायालयात मागणी

**मुंबई–** महाराष्ट्रातील मोठ्या राजकीय घडामोडीत आता राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) पक्षमान्यतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेद्वारे मनसेची मान्यता रद्द करण्याची मागणी करण्यात आली असून, परप्रांतीयांविरोधात दिलेल्या कथित प्रक्षोभक वक्तव्यांवरून ही याचिका सादर करण्यात आली आहे.

गुढीपाडव्याच्या दिवशी झालेल्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी मराठी भाषेसंदर्भात चळवळ उभी करण्याची घोषणा केली होती. बँका व खासगी आस्थापनांत मराठीचा वापर होतो की नाही, याची तपासणी करण्याचे आदेश त्यांनी मनसैनिकांना दिले होते. त्यानंतर उत्तर भारतीय विकास सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली, ज्यामध्ये राज ठाकरे यांच्यावर परप्रांतीयांविरोधात चिथावणीखोर वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या याचिकेत राज ठाकरे यांच्या भाषणांचा उल्लेख करत, त्यांनी उत्तर भारतीयांविरोधात सातत्याने भडकावू वक्तव्य केल्याचे नमूद करण्यात आले आहे. राज ठाकरे आणि मनसेने निवडणूक आचारसंहिता आणि घटनात्मक सीमांचे उल्लंघन केले असल्याचा आरोपही यामध्ये आहे.

# ग्रामपंचायत ते नगरविकास,सामान्यांसाठी मंत्रिमंडळाची मोठी भेट!

**मुंबई–**राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्यापासून ते सरकारी बांधकामांमध्ये कृत्रिम वाळूचा वापर अनिवार्य करण्यापर्यंत आणि सिंधी विस्थापितांच्या वसाहती नियमित करण्यापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण धोरणांचा समावेश आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयांची माहिती दिली. ही बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यभरातील घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना आता ५ ब्रास वाळू मोफत मिळणार आहे. यासाठी प्रत्येक वाळूघाटावर १० टक्के वाळू आरक्षित ठेवली जाईल. ज्या ठिकाणी पर्यावरण मंजुरी नाही, तेथे स्थानिक ग्रामपंचायतींमार्फत पुढील कारवाई केली जाईल. तसेच, नैसर्गिक वाळू उपशावर मर्यादा आणण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सरकार लवकरच एम–सँड धोरण आणणार आहे. या धोरणानुसार, सर्व सरकारी बांधकामांमध्ये नदीच्या वाळूऐवजी दगडांपासून तयार केलेली कृत्रिम वाळू (एम–सँड) वापरणे बंधनकारक केले जाईल.

याशिवाय, १९४७ च्या फाळणीनंतर विस्थापित झालेल्या सिंधी समाजाच्या वसाहती नियमित करण्याचा मोठा निर्णयही घेण्यात आला आहे. राज्यात नागपूर , जळगाव , मुंबई अशा ठिकाणी सुमारे ३० सिंधी वसाहती असून, त्या कायदेशीर नसल्याने रहिवाशांना अनेक अडचणी येत होत्या. आता ङ्गविशेष अभय योजना–२०२५फ अंतर्गत, ज्यावेळी जमीन घेतली त्यावेळच्या रेडी रेकनर दरांवर आधारित शुल्क आणि १० टक्के कर आकारून या सर्व वसाहती नियमित करून त्यांना क्लास–वनचा दर्जा दिला जाणार आहे. निवडणुकीतील वचन पूर्ण केल्याचे बावनकुळे म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

नगरविकास विभागाच्या निर्णयानुसार नाशिक, नागपूर, पुणे व छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणांकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहेत. त्यामुळे विकासकामांना वेग मिळणार आहे. महसूल विभागाने राज्याचे नवीन ङ्गवाळू – रेती निर्गती धोरण २०२५फ जाहीर केले असून, त्यामुळे वाळू उपलब्धतेचा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.

गृहनिर्माण विभागाने झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेस गती देण्यासाठी १९७१ च्या झोपडपट्टी सुधारणा अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय वांद्रे रिक्लेमेशन आणि वरळीतील आदर्श नगर येथील म्हाडा प्रकल्पाचे एकत्रित पुनर्विकास उ।ऊ्अ मार्फत करण्यात येणार आहे. महसूल विभागाने सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी विशेष अभय योजना २०२५ जाहीर केली आहे.

वैद्यकीय शिक्षण विभागाने खाजगी अनुदानित आयुर्वेद आणि युनानी संस्थांमधील गट–ब, क आणि ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना ङ्गसुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाङ्घ लागू केली आहे. तसेच, शासकीय आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी अध्यापकांचे ठोक मानधन निश्चित करण्यात आले आहे.

ग्रामविकास विभागाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे ग्रामीण प्रशासन अधिक सक्षम होईल आणि लोकसहभाग वाढेल. नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्याचाही निर्णय झाला असून, आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात हे एक मोठे पाऊल ठरणार आहे.

## वनहक्क पट्टया संदर्भात कुणीही वंचित राहु नये:-आम.राजकुमार बडोले



**अर्जुनी–मोर.**–विधानसभा क्षेत्रात अनेक गावातील शेतक–यांचे वनहक्क दाव्यांचे प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबित आहेत. काही दावे अटी आणी शर्तीमुळे रेंगाळलेले आहेत. ती सर्व प्रकरणे निकाली कसे काढता येतील याकरीता जनता दरबाराचे माध्यमातुन रेंगाळलेले वनहक्क दाव्यांचे प्रकरण निकाली काढण्यासाठी आपन प्रयत्नशील आहोत.या संदर्भात आपण लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक लावुन हे प्रकरण मार्गी लावण्याचे दृष्टीने आपन प्रयत्न करु.अर्जुनी–मोर. विधानसभा क्षेत्रातील कुणीही वनहक्क पट्यासाठी वंचित राहु नये असे आपले प्रयत्न असल्याचे प्रतिपादन आमदार ईजी.राजकुमार बडोले यांनी केले आहे.

अर्जुनी–मोर. येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात ( ता.७)वन हक्क दावे आणि जनसामान्यांच्या विविध समस्यांवर मार्ग काढण्यासाठी विशेष जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले.त्यावेळी आमदार राजकुमार बडोले बोलत होते.या जनता दरबारात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या समस्या मांडल्या.

या जनता दरबाराचे आयोजन वन हक्क दाव्यांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण व्हावे या उद्देशाने करण्यात आले होते. शेकडो नागरिकांनी आपल्याला भेडसावणाऱ्या विविध समस्या सविस्तरपणे मांडल्या, ज्यातील अनेक समस्यांचे तत्काळ निराकरण करण्यात आले. नागरिकांना यामुळे दिलासा मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.या कार्यक्रमाला जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर, जि.प. महिला व बालकल्याण सभापती पोर्णिमाताई ढेंगे, उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे, अर्जुनी–मोर तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, सडक अर्जुनी तहसीलदार इंद्रायणी गोमासे, माजी जि.प. उपाध्यक्ष यशवंत गणवीर, सभापती आम्रपालीताई डोंगरवार, सभापती चेतन वळगाये, यशवंत परशुरामकर, नगराध्यक्ष मंजुषाताई बारसागडे,कविताताई रंगारी,बीडीओ पल्लवी वाडेकर,आरएफओ अविनाश मेश्राम,श्री.पवार,श्री.अवगान,श्री.बहुरे, लोकपाल गहाणे,विजय कापगते, किशोर तरोणे यांच्यासह पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

## लग्नाच्या जेवणातून विषबाधा;४०जणांवर उपचार सुरु



**गोंदिया:** जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात बबई या गावी लग्न सोहळ्यातील जेवणातून या लग्न समारंभातून जवळपास ५५ ते ६० लोकांना विषबाधा झाल्याची घटना ५ एप्रिलला घडली.यामध्ये ८ बालकांचा समावेश असून चौघांची प्रकृती चिंताजनक असल्याने .त्यांना गोरेगाव ग्रामीण रुग्णालय, चोपा प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदियासह खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

विषबाधा झालेल्यापैकी अनेकांना उपचारानंतर सुट्टी देण्यात आली असून अद्यापही ३०–३४ जणांवर उपचार सुरु आहेत.घटनेची माहिती मिळताच आमदार विजय रहागंडाले,परिणय फुके,इंजि.राजकुमार बडोले यांच्यासह जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती डॉ.लक्ष्मण भगत,पं.स.सभापती चित्रकला चौधरी,माजी सभापती मनोज बोपचे,विश्वजीत डोंगरे,कॉंग्रेसनेते डेमेद्रं रहागंडाले आदींनी भेट देत विषबाधा झालेल्या रुग्णाची विचारपूस केली.

सविस्तर वृत्त असे की गोरेगाव तालुक्यातील बबई रहिवासी केशवराव भोजलाल बिसेन यांच्या धाकट्या मुलाचा लग्न सोहळा शुक्रवार ४ एप्रिल २०२५ रोजी आमगाव तालुक्यातील वळद या गावी झाला. लग्नसमारंभ आटोपल्या नंतर वरात शनिवार ५ एप्रिल ला दुपारी वराच्या घरी बबई येथे आली.

दुपारच्या सुमारासच वरातीतील आणि घरच्या मंडळी करिता जेवण तयार करण्यात आले. त्यांना जेवण केल्यानंतर दोन–तीन तासाने सायंकाळच्या सुमारास उलट्या जुलाब आणि अतिसारचा त्रास जाणू लागला असता शनिवारी सायंकाळी ७:३० वाजता पासून जवळील गोरेगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार करिता आणण्यास सुरुवात झाली. तर काही रुग्णांना त्रास जाणू लागल्यानंतर बबई गावा जवळील चोपा प्राथमिक केंद्र येथे दाखल करण्यात आले.

मध्यरात्रीच्या सुमारास यापैकी पाच ते सहा रुग्णांना अधिकचा त्रास जाणू लागला असता त्यांची प्रकृती अत्याधिक अत्यव्यस्थ होत असल्याचे बघून गोरेगाव ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना गोंदिया येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले आहे . अशा ५ रुग्णांवर गोंदिया येथील के. टी.एस. जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे.

# कृषी वीजपुरवठा तातडीने १२ तास पूर्ववत करा

## आमदार अग्रवालांचा:अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलनाचा इशारा

**गोंदिया** : शासन आदेशानंतरही शेतीसाठी १२ ऐवजी आठ तास वीजपुरवठा केला जात असल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. अशात आमदार विनोद अग्रवाल यांनी सोमवारी (दि.७) वीज वितरण कंपनीचे कार्यालय गाठले व अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून १२ तास वीजपुरवठा करण्यासंदर्भात पत्र दिले.

सध्या उन्हाळी पिकांसाठी आठ तास वीजपुरवठा होत असल्याने पिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाबाबत आमदार अग्रवाल यांनी फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मोबाइलवर संदेश पाठवून शेतीचा वीजपुरवठा १२ तासांपर्यंत वाढविण्याची मागणी केली होती. शासनाने या संदेशाला तत्काळ प्रतिसाद दिला आणि वीज विभागाला १२ तास वीजपुरवठा करण्याचे आदेश दिले होते. आदेशानुसार वीज मंडळाने शेतीसाठी १२ तास वीजपुरवठा केला, ज्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी आणि उन्हाळी हंगामात मोठ्या प्रमाणात भाताची लागवड केली. परंतु आता भर उन्हाळ्यात वीज विभागाने वीजपुरवठा १२ तासांवरून ८ तास वीजपुरवठा केला जात असल्यामुळे पिके धोक्यात येत आहेत.

४ तासांपर्यंत कमी केल्याने ही समस्या पुन्हा गंभीर झाली आहे. शासन आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने आमदार अग्रवाल यांनी सोमवारी (दि. ७) महावितरण कार्यालय गाठले.

याप्रसंगी त्यांनी मुख्य अभियंता सुहास रंगारी, अधीक्षक अभियंता रामराव राठोड, कार्यकारी अभियंता आनंद जैन यांच्याशी चर्चा करून पत्र देत पिकांसाठी शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणेच १२ तास वीजपुरवठा करण्याची मागणी केली.



निवेदन देताना सरपंच संदीप तुरकर, विक्की बघेले, ललित खजरे, लुकेश बंशपाल, रुद्रसेन खांडेकर, रूपचंद पटले, हीरा बघेले, संजय कुंभलवार, अक्षय कहनावत, मुकेश बघेले, राहुल पटले, हरलाल बघेले आदींसह मोठ्या संख्येत शेतकरी उपस्थित होते.

**आंदोलनात्मक भूमिक घेणार**

याप्रसंगी आमदार अग्रवाल म्हणाले,वीज कपातीमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये व्यापक असंतोष निर्माण झाला असून, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जर शेतकऱ्यांना तत्काळ १२ तास वीजपुरवठा पूर्ववत केला नाही, तर आम्हाला आंदोलनात्मक भूमिका घेण्यास भाग पाडले जाईल, ज्याची संपूर्ण जबाबदारी विभागाची असेल.

## संपादकीय

### अमेरिकेत जागृत जनता ट्रम्प विरोधात रस्त्यावर

अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफविरोधात अमेरिकेत हजारो आंदोलक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी ट्रम्प यांच्याशिवाय एलॉन मस्क यांच्याविरोधातही घोषणा दिल्या. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा संताप आंदोलकांच्या घोषणांतून व्यक्त होत होता आणि ट्रम्प यांनी लागू केलेल्या नव्या दरवाढीमुळे जगभरातील स्टॉक मार्केट आज अक्षरशः कोसळले. सकाळी सुरुवात झाल्यापासूनच बाजार कोसळण्याचे संकेत मिळाले आणि त्यातून ट्रम्प यांच्या मनमानी धोरणाची झलक पाहायला मिळाली होतीच. आजचे आंदोलन हे ट्रम्प यांच्या प्रशासनाविरोधातील सर्वात मोठे आंदोलन होते हे अनेकांनी नमूद केले आहे आणि हे आंदोलन ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे अमेरिकन लोकांच्या मनातील राग यानिमित्ताने दिसून आला आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे केवळ जास्त कर द्यावे लागतात हा एकमेव मुद्दा नाही, तर हजारो लोकांच्या नोकऱ्या जाऊन ते बेरोजगार होणार आहेत. तसेच त्यांना निवृत्तीनंतर जे लाभ मिळत असतात त्यांना चांगलीच कात्री बसणार आहे. लोकांच्या मनातील राग हा आहे.

अमेरिकेत मध्यमवयीन तसेच वृद्ध नागरिकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे निवृत्तीनंतरच्या लाभांना तेथे अत्याधिक महत्त्व आहे. पण ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे अमेरिकन नागरिकांना या लाभांवर पाणी सोडावे लागणार आहे. त्यामुळे लोक रस्त्यावर उतरले आहेत ही वस्तुस्थिती आहे. आंदोलनातील लोकांचा राग जसा वाढत आहे तशीच त्यामागील उत्स्फूर्तता वाढत आहे. अर्थात ट्रम्प यांच्यावर याचा परिणाम होणार नाही, कारण त्यांनी असे म्हटले आहे की, काही मिळवायचे असेल तर काही गमवावे लागतेच. अनेक जागतिक नेत्यांनी ट्रम्प यांच्याशी टॅरिफवर बोलणी केली आहेत आणि त्यात जपानचा समावेश आहे तसेच ब्रिटनचा समावेश आहे. पण ट्रम्प त्यांचे ऐकतील असे वाटत नाही, असे तज्ज्ञांना वाटते. ट्रम्प यांच्या धोरणाविरोधात सर्वप्रथम नॅशनल मॉल येथे निदर्शने आयोजित केली गेली आणि ती लाट हळूहळू सर्व जगभर पसरत आहे. इतर अनेक शहरांमध्ये असेच गट आंदोलन करत आहेत आणि त्यांचा रोख आहे तो ट्रम्प यांच्यावर. ट्रम्प, मस्क आणि अनेक अब्जाधीश मिळून आम्हाला बरबाद करू पाहत आहेत असा त्यांचा आरोप आहे. त्याला ट्रम्प यांनी काहीही उत्तर दिले नाही. ट्रम्प यांच्या रेसिप्रोकल टॅरिफमुळे जगाला हादरा बसला आहे तरीही भारतावर त्याचा सर्वात कमी परिणाम झाला आहे असे काहींचे म्हणणे आहे. त्याच्या टॅरिफमुळे जगभर शॉकवेव्हज निर्माण झाल्या आहेत हे निश्चित आहे; परंतु जागतिक बाजारपेठा मात्र धक्क्यात आणि गोंधळाच्या स्थितीत आहेत हे लपवून चालणार नाही. ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे मुक्त व्यापाराला धक्का बसला असला तरीही त्याचा धक्का अगदीच गंभीर जखमी करणारा नसेल असे काहींनी म्हटले आहे. पण अमेरिकेच्या टॅरिफ वॉरमुळे जागतिक बाजारावर त्याचा विपरित परिणाम होणार आहे हे निश्चित. या टॅरिफ वॉरमुळे फ्री ट्रेडला धक्का बसला असला तरीही त्यामुळे मोठे गुंतवणूकदार खासगी इक्विटी विकून टाकण्याचा विचार करत आहेत, हे कोणत्याही बाजाराला धोकादायक आहे. सर्व जगभरात ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे लोक रस्त्यावर आले आहेत आणि त्यांना चिंता आहे ती आपल्या भवितव्याची.

जागतिक बाजारपेठांमध्ये ट्रम्प यांच्या शुल्कामुळे प्रचंड आर्थिक उलथापालथ झाली आहे आणि त्यामुळे गुंतवणूकदारांना भीती किंवा भावनेने प्रेरित होऊन निर्णय न घेणे हीच आज सर्वात महत्त्वाची बाब बनली आहे. त्याला लोक कसे सामोरे जातात यावर ट्रम्प यांच्या या टॅरिफ योजनेचे यशापयश अवलंबून आहे. आर्थिक बाजारपेठ ही अनिश्चिततांनी भरलेली आहे, त्यामुळे कोणत्याही क्षणी कसलाही आततायी निर्णय न घेता आलेली परिस्थिती स्वीकारून शांतपणे निर्णय घेणे ही आजची जबाबदारी आहे हे ओळखून लोकांनी वागायला हवे. ट्रम्प यांच्या व्यापार करामुळे मुंबई शेअर बाजारात उलथापालथ झाली आहे आणि तेथे शेअर्स कोसळले आहेत, त्यामुळे सेन्सेक्स २६०० अंकांनी कोसळला आणि ही मोठी पडझड आहे. निफ्टीचीही हवालदिल अवस्था झाली आहे आणि त्यामुळे सर्व क्षेत्रांतील गुंतवणूकदार हवालदिल झाले आहेत. त्यामुळे ट्रम्प यांचा निर्णय एकट्या अमेरिकेपुरता मर्यादित नाही, तर सर्व जगाला त्याचा फटका बसला आहे. ही अत्यंत दयनीय परिस्थिती आहे. यातून अमेरिकेतच नव्हे, तर जगभरात मंदी ओढवणार आहे. या परिस्थितीमुळे जगाला १९२९ च्या जागतिक मंदीची आठवण आली, तर नवल नव्हे. त्यावेळी अमेरिकेत अशीच मंदी आली होती आणि त्यानंतर अमेरिका कोसळली होती. तेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष होते हर्बर्ट हूव्हर. त्यांच्या काळात स्टॉक मार्केट कोसळले होते आणि कित्येकांनी आत्महत्या केल्या होत्या. आज एवढी परिस्थिती नसली तरीही अमेरिका आजही तितकीच दयनीय स्थितीत आहे हे या लोकांच्या आंदोलनामुळे सिद्ध झाले आहे. आज अमेरिकन जनता रस्त्यावर आहे आणि त्याचे पडसाद सर्व जगभर उमटत आहेत. आज अमेरिकेत करण्यात आलेली निदर्शने ही सर्वात मोठी होती, असे आता सांगण्यात येत आहे. पण ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे आणखी एक गंभीर परिणाम समोर आला आहे आणि तो म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेला धक्का बसला आहे. त्यामुळे धोक्याचे संकेत मिळाले आहेत. त्यातून जग कसे सावरणार हे आता प्रत्येक देशावर अवलंबून आहे. उद्योगांमध्ये घसरण झाली आणि प्रत्युत्तराच्या धमक्या यांची एक लाट आली आहे. त्यामुळे जगभर एक प्रतिस्पर्धेचे वातावरण निर्माण झाले आहे आणि चीनने अमेरिकेवर गुंडगिरी केल्याचा आरोप केला, तर युरोपियन युनियनने अमेरिकेवर तसेच कर लावण्याची धमकी दिली आहे. व्यापार युद्ध आणि शुल्क युद्धामध्ये कुणीही विजेता नसतो असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते म्हणाले, ते तंतोतंत सत्य आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांनी अमेरिकेला आपला टॅरिफ मागे घेण्याचे आवाहन केले आहे. अर्थात अमेरिका ते मानणार नाही हे सत्य आहे. त्यामुळे या युद्धात फक्त जगच नव्हे तर अमेरिकाही होरपळणार आहे. पण ट्रम्प यांच्यासारख्या हट्टी नेत्याला हे सांगणार कोण अशी परिस्थिती आहे.

# राष्ट्रपिता ज्योतिबा फुले स्त्री क्रांतीचे प्रणेते का झाले?

भारतीय मातीत स्त्रीला सामाजिक समतेचा दर्जा भ. बुद्धांनी प्राप्त करून दिला. भ. बुद्धांच्या या स्त्री सामाजिक क्रांतीनंतर ब्राम्हणांचे सामाजिक स्थान कमकुवत होऊन ते समाज व्यवस्थेत सर्वसामान्य ठरले. म्हणजेच त्यांच्या वर्णश्रेष्ठत्वाला धक्का पोहचला. त्यांचा ब्राम्हणी वर्ण लयाला गेला. त्यांना कोणी विचारीणासे झाले. यामुळे ब्राह्मणांनी पुष्यमित्र शुंगाला बळ देऊन कटकारस्थानाने बोधिसत्व राजा बृद्रथ याचा खून केला व येथून पुढे खऱ्याअर्थाने ब्राम्हणी प्रतिक्रांतीला सुरवात झाली आणि ब्राम्हणांनी बुद्धांनी स्थापन केलेली नैतिकतेची, सम्यक कर्मावरची समाजव्यवस्था मोडीत काढून, आपली ब्राम्हणी वर्णश्रेष्ठत्वाची जुलमी व शोषित समाजव्यवस्था निर्माण केली. याविषयी डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

"बुद्ध धम्माच्या राजवटीच्या काळात, शूद्रांना फारच वरचा दर्जा प्राप्त झाला होता. त्याचप्रमाणे स्त्रियाही समतेच्या शिखरावर पोहोचल्या होत्या. या दोन वर्गाच्या अप्रतिम उत्कर्षाने ब्राह्मण अत्यंत दुखावलेले होते. एवढेच नव्हे, तर ब्राह्मणांना ते सहनही होत नव्हते. ब्राम्हणांच्या पवित्र समाजरचनेची पायापासून शिखरापर्यंत नुसती उलथापालथ होऊन गेली होती. पहिला नंबर शेवटी गेला होता व शेवटचा नंबर पहिला बनला होता. (ॲड. बी. सी. कांबळे, संदर्भ समग्र आंबेडकर चरित्र, खंड – २०,सुगावा प्रकाशन पुणे.)

बुद्धांच्या नंतर जवळजवळ २४०० वर्षांनी राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी स्त्री सामाजिक क्रांतीला हातभार लावला. म्हणून तर डॉ आंबेडकरांनी त्यांना आपले तिसरे गुरू मानले व राष्ट्रपिता फुलेंना भगवान बुद्धांच्या पंक्तीत नेऊन बसवले.

राष्ट्रपिता फुलेंनी स्त्री सामाजिक क्रांतीची चळवळ हाती घेतली याला कारण म्हणजे त्यावेळची सामाजिक परिस्थिती व परकीय ब्राम्हणांचे मूळभारतीय समाजात वाढलेले प्राबल्य हे होय. कारण यावेळी संपूर्ण ब्राम्हणी हिताच्या मनुस्मृतीचे राज्य होते. यात फक्त शूद्र वर्गातला आजचा ओबीसी, एसटी–एससीच भरडला गेला नव्हता, तर त्यात स्त्री वर्गही मोठ्या प्रमाणात भरडला गेला होता. तिला फक्त उपभोगाचे साधन व मुले निर्माण करण्याचे मशीनच समजले जात होते. या मोबदल्यात तिला कोणताच सामाजिक मानसन्मान दिला गेला नव्हता व तसा मनूचा कोणताही कायदा अथवा नियमही नव्हता. सतीप्रथा, विधवा प्रथा, केशोवोपन प्रथा, बालविवाह, जरठ विवाह, देवदासी प्रथा, मुरळी प्रथा यांनी थैमान घातलेले होते व या मरणप्राय मनूच्या नियम व कायद्यांचा ब्राम्हण वर्ग उदोउदो करून तिलाच संस्कृतीचे लेबल चिकटवून आपले वर्णश्रेष्ठत्व आबादीतपणे राखत होता.

येवढेच नाही तर इतर स्त्रियांची लग्ने झाल्यानंतर त्या पवित्र करण्यासाठी पहिल्या रात्री ब्राम्हणाकडे पाठवल्या जात होत्या. यातून राजे महाराजे ही सुटलेले नव्हते. कारण याविषयी पुरावा म्हणून लग्न झाल्यानंतर पहिल्या तीन रात्री त्या विवाहित स्त्रीबरोबर संभोग केल्याशिवाय नव–यास पत्नीबरोबर नवरा बायको म्हणून राहाता येत नाही, असा दावा राष्ट्रपिता ज्योतिबा फुलांच्या काळातच १८६९ मध्ये मुंबई इलाख्यातील वैष्णव पंथाच्या पुजा–यांनी आपल्या हक्कासाठी मुंबई हायकोर्टात दाखल केला होता. (संदर्भः– प्रा. गौतम निकम, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री, पृ. २९) याच प्रथेचे मूळ आज आपल्याला लग्नानंतर सत्यनारायण पूजा घालण्या पाठीमागच्या कारणात सापडते.



राष्ट्रपिता ज्योतिबा फुलेंच्या काळात देवदासी प्रथा मोठी जोरात होती. हि देवदासी प्रथा म्हणजे देवळातील ब्राम्हण पुजा–यांचे शारीरिक वासना शांत करण्याचे एक साधन होते. देवाच्या नावाखाली हा व्याभिचार मोठा जोरात चाललेला होता. बहुजनांनी धर्माच्या नावाखाली देवाला सोडलेल्या देवदासी, मुरळी यांच्यावर या देवळातच पुजा–यांकडून बलात्कार होत असत. तसेच राजे, दरबारातील माणसे, गावचे पाटील– कुलकर्णी यांचेही शारीरिक भूक भागवण्याचे देवदासी एक साधन होते. यासाठी या देवदासीच्या छातीवर ठळकपणे दिसेल असे शंख, चक्र व गरूड गोंधले जात असत. शंख असलेल्या देवदासी या फक्त पुजारी ब्राम्हणांच्या उपभोग्य वस्तू, तर चक्र असलेल्या ह्या राजे लोकांच्या उपभोग्य वस्तू होत्या. तर गरूड गोंधलेल्या देवदासी ह्या राजदरबारातील माणसे, पाटील व कुलकर्णी या लोकांसाठी राखीव असत.

देवदासीची दीक्षा घेतल्यानंतर त्या देवदासीचा पहिला शारीरिक उपभोग घेण्यासाठी गावातील प्रतिष्ठित धनिकांमध्ये चढाओढ लागत असे. तसेच पैशांची बोली लागत असे. तर काहीजण एखाद्या देवदासीला आपली कायमची रखेल म्हणून ठेवत असत. यातच झुलवा नावाची एक वेगळीच पण समाजमान्य प्रथा होती. या प्रथेत त्या देवदासीला एखाद्या श्रीमंत पुरूषासी लग्न करावे लागत असे. लग्न केल्यावर तिला मुले होत. पण मुले झाल्यावर मात्र बाप म्हणून त्या मुलांना त्या माणसाचे नाव मिळत नसे. तसेच त्या मुलांची कोणतीच कागदोपत्री नोंद केली जात नसे. म्हणजेच त्या देवदासीला लग्न करून, तिचा राजरोस उपभोग घेऊन व तिला मुले जन्माला घालून आयुष्यभर झुलवत ठेवणे व तिला कोणतेही अधिकार न देणे म्हणजे ही झुलवा पद्धत होय.

यानंतर त्यावेळी समाजात विधवा प्रथा होती. या प्रथेत नवरा मेल्यानंतर त्या स्त्रीला विधवा म्हणून ठेवले जात असे. हे विधवेचे आयुष्य जगताना तिने एकटेच राहायचे. घरातील उष्टे उरले सुरले खावून जगण्याची पद्धत होती. पुढेपुढे यातच भर म्हणून तिचे केशोवोपन करण्याची प्रथा रूढ झाली व तिचे विद्रुपीकरण करण्यात आले. हे सर्व बहुजन समाज आपल्याच लेकी बाळींचे धर्माच्या नावाखाली फक्त ब्राम्हणाच्या सांगण्यावरून अमानुष छळ करत होता हे विशेष होय. यासाठी राष्ट्रपिता फुले यांनी नाव्ही समाजाचा संप घडवून आणला व केशोवोपन प्रथा बंद पाडली. तसेच विधवांसाठी स्वतंत्र आश्रम उघडला व त्यांच्या आयुष्याला आधार दिला.

अशीच स्त्रीयांच्या बाबतीतील अमानुष व जीवघेणी प्रथा म्हणजे सतीप्रथा होय. हि प्रथा मनुस्मृतीत सापडत नसली तरी तिचे मूळ विष्णूस्मृतीत आहे. या सतीप्रथेपासून ब्राम्हणांना दुहेरी फायदा होता. पहिला फायदा म्हणजे नवरा मेल्यानंतर विधवा झालेली स्त्री समाजात व विशेषतः जातीत एक भर होती. जर तिने परजातीच्या पुरूषा बरोबर समागम केले, तर जात बंधने तुटतील व निर्माण केलेली जात व्यवस्था व वर्णव्यवस्था मोडून पडेल. याची भीती ब्राम्हणांना होती. जातिव्यवस्थेला कोणताही धक्का लागू नये व ती जीवंत रहावी म्हणून त्यांनी सतीप्रथेचा उदोउदो केला व ती टिकवून ठेवून असंख्य स्त्रियांना पुण्य व स्वर्ग या भंपक व कुटील थापांवर धर्माच्या व हिंदुत्वाच्या नावाखाली बळी दिले.

या सतीप्रथेचा दुहेरी फायदा म्हणजे सती जाणा–या स्त्रीनेश पतीने व बापाने केलेले किंवा लग्नात दान दिलेले सर्वच दागिने घालावेत व कुंकवाचा मळवट भरावा असा नियम होता. कारण सती जाणारी स्त्री पतीच्या चित्तेवर बसल्यानंतर तिच्या अंगावरील संपूर्ण दागिने उतरवून घेण्याचा एकमेव अधिकार हा ब्राम्हणाचा होता. अहेवाचा दागिना म्हणून फक्त तिच्या कपाळाला कुंकूच ठेवले जात होते. म्हणून आजही कवडीमोल किंमतीच्या कुंकवाचा ते अहेवाचा दागिना समजतात व त्यालाच सोन्या पेक्षा जास्त किंमत देतात. म्हणजेच थोडक्यात या सतीप्रथेतून प्रत्येक मृत स्त्रीमागे ब्राम्हणाला स्वर्गप्राप्तीच्या नावाखाली व पुण्य, मोक्ष यांच्या नावावर भरपूर आयता द्रव्य लाभ होत होता. म्हणून स्त्री सतीप्रथेला ते आपल्या कमायीचे सर्वात मोठे साधन मानत होते. आजही त्यांची ती अपेक्षा संपलेली नाही. हिंदुत्वाच्या नावाखाली ते आजही ती प्रथा सुरू करू पहात आहेत.

याच पद्धतीने ब्राम्हणांनी आपली कुटील व अमानवी अक्कल व हुशारी आपल्या पुरतीच मर्यादित रहावी व हा बहुजन समाज आपल्याला आयता लूटता यावा, तसेच तो कोणत्याच जन्मात शहाणा व आपल्यापेक्षा हुशार होवू नये म्हणून त्यांनी विद्याबंदी, समुद्र ओलांडून ज्ञान घेण्यास परदेशात जावू नये व त्याचा जगाशी संपर्क येवू नये म्हणून समुद्रबंदी, आपल्या विरोधात क्रांती करू नये म्हणून शस्त्रबंदी यासारखे आपल्याच हिताचे कायदे केलेले होते.

पण या सर्वांवर मात एकट्या राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी केली. हे सगळे अनर्थ एका अविद्येने केले हे त्यांनी प्रथम ओळखले. यातूनच त्यांनी बहुजनांच्या दुःखाचे मूळ ओळखून १८४८ ला मुलींची पहिली शाळा काढली. स्त्री जर वाचली तर समाज वाचेल. एक स्त्री शिकली तर एक कुटुंब शिकेल आणि एक कुटुंब शिकले तर समाज शिकेल. असा विचार करून नैतिकतामय व सम्यक कर्म करणारा, सम्यक दृष्टीचा समाज निर्माण करण्याचे व्रत त्यांनी हाती व यासाठी त्यांनी नैतिक व निसर्ग नियमांवर आधारित असलेल्या सत्यशोधक धर्माची स्थापना केली व भ. बुद्धांनी दाखवलेल्या मार्गाने ते गेले. म्हणजेच त्यांनी ब्राम्हणी दृष्टीचा अमानवी व अमानुष धर्म नाकारला व लाथाडलाही. म्हणून ख–यार्थाने स्त्री चळवळीचे जनक व प्रणेते राष्ट्रपिता ज्योतिबा फुले हेच आहेत. यावर माझा पूर्ण विश्वास आहे.

**दिपक गायकवाड**

## डिजिटल ग्राहक योजनेमध्ये गोंदिया परिमंडळात एकूण ३६ विजेता

**गोंदिया,:** महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा पहिला लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने दि. ०७/०४/२०२५ रोजी, काढण्यात आला.या लकी ड्रॉतून पहिल्या क्रमांकाचे ६५१ तर दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ व तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेते जाहिर करण्यात आले. विजेत्या ग्राहकांची यादी महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रत्येक उपविभाग स्तरावर एक या प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन बक्षिस म्हणून दिले जात आहे तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस म्हणून दिले जात आहे.

यापुढील लकी ड्रॉ मे व जून २०२५ या महिन्यात काढण्यात येईल.

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत.

०१ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले ऑनलाईन पध्दतीने भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एल टी– लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही.

अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट द्यावी.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते.

परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट द्यावी.

## जागतिक आरोग्य दिन साजरा

**गोंदिया–** ७ एप्रिल जागतिक आरोग्य दिन कार्यक्रम जिल्हा परिषद आरोग्य विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या एकत्रित सहकार्याने साजरा करण्यात आला. १९४८ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या स्थापनेचा वर्धापन दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. दरवर्षी, जागतिक आरोग्य दिन हा जगभरातील लोकांना प्रभावित करणाऱ्या विशिष्ट आरोग्य विषयाकडे लक्ष वेधण्याची संधी म्हणून वापरला जातो.आरोग्य ही माणसाची सर्वात महत्त्वाची आणि अमूल्य संपत्ती आहे.त्यामुळे जागतिक आरोग्य दिनी समाजात आरोग्याशी संबंधित समस्या आणि आरोग्यासंबंधित अधिकार याबद्दल आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर जनजागृती करण्यात येते.दरवर्षी एका विशिष्ट थीमवर भर देऊन, जागतिक आरोग्य दिन सरकारे, आरोग्यसेवा संस्था आणि व्यक्तींना आरोग्य मानके सुधारण्यासाठी आणि आरोग्यसेवेची उपलब्धता सुधारण्यासाठी एकत्रितपणे काम करण्यास प्रोत्साहित करत असल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी यावेळी दिली आहे.

## मतभेद विसरून सर्वांनी जिजाऊ रथयात्रेत सहभागी व्हावे :- सुनील तरोणे



**अर्जुनी–मोर–**स्वराज्य संकल्पक राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ रथयात्रेचे १२ एप्रिल रोजी गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यात आगमन होणार आहे. या रथयात्रेत आपापसातील मतभेद विसरून सहभागी होण्याचे आवाहन मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवश्री इंजि. सुनील तरोणे यांनी केले आहे.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगाव बांध येथील ग्रीन पार्क रेस्टॉरंट मध्ये आयोजित जिजाऊ रथयात्रेच्या नियोजन संदर्भातील बैठकीमध्ये अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. लाखांदूर येथून रथयात्रेचे आगमन अर्जुनी मोरगाव तालुक्यातील धाबेटेकडी येथे सायंकाळी चार वाजता होणार असून अर्जुनी मोरगाव येथे महाराणा प्रताप चौकात सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. व नवेगाव बांध येथे छत्रपती शिवरायांच्या जीवनावर महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रथयात्रेच्या आगमना प्रित्यर्थ गावागावात सर्व शिवप्रेमींनी, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व नागरीकांनी उपस्थित राहुन ढोल ताशाच्या गजरात रथयात्रेचे स्वागत करण्याचे आवाहन सुनील तरोणे यांनी केले आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष क्रांतीसिंह ब्राह्मणकर, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा संयोजिका सविताताई बेदरकर, सुनीताताई भेलावे, पद्मजा मेहेंदळे, प्रबोधनकार मुक्ताबाई हत्तीमारे, अनिल मुनेश्वर, प्रशांत गायधने, रामदास बोरकर, दादा संग्रामे, लोकपाल गहाणे, विजय डोये, चेतन डोये, होमदास ब्राम्हणकर, उद्धव मेहंदळे, कृष्णकांत खोटेले, प्रकाश शिवनकर, आरती चव्हाण, मंजू शिवणकर, प्रिया हरडे, तेजस्विनी पडोळे, सारिका रंगारी, मीनल टेंबरे, सुनीता ब्रम्हपुरे व इतर उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधुनिक विकासाची दुरदृष्टी

विषमतेने ग्रासलेल्या विषमतावादी समाज व्यवस्थेमध्ये बहुजनांना दिली जाणारी वागणूक ही जनावरांना दिल्या जाणाऱ्या वागणूकीपेक्षा खालच्या दर्जाची होती. या व्यवस्थेच्या मुळावर घाला घालून मानव म्हणून जगण्याचा अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवून दिला. प्रचलीत समाज व्यवस्थेच्या विरोधातील हा लढा अखिल मानव जातीच्या मानवी हक्क प्राप्तीचा होता. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली प्रतीक्रांती ही सर्व मानवजातीला एकतेचा व समानतेचा हक्क प्रदान करणारी होती. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देणाऱ्या ह्या लढ्याचे नेतृत्व बाबासाहेब आंबेडकरांनी केले. काळाची पावले जसजसी बदलत गेली तसे बाबासाहेबांचे विचार आणि कार्य दलित, आदिवासी ते बहुजनांपर्यंत सर्वमान्य झाल्याचे दिसून आले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील गरीब, दलित, पिडीत, महिला, कामगार आणि सर्व वंचित घटकांना न्याय, हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले, त्याला जगाच्या इतिहास तोड नाही. या देशाला जगातील शक्तिमान आणि संपन्न राष्ट्र बनवायचे असेच तर त्यासाठी समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळाली तरच ते शक्य होईल. ही बाब द्रष्ट्या बाबासाहेबांनी सर्वात आधी ओळखली होती. त्यामुळेच त्यांनी आपली सर्व विद्वत्ता भारतील घटना तयार करतांना पणास लावली आणि जगातील सर्वश्रेष्ठ अशा घटनेचा जन्म झाला. भारतील राज्य घटनेने न्याय, बंधुता, समानता या तत्वांना अंगीकारत सर्व घटकांच्या सर्वांगीन विकासाचा मार्ग मोकळा करून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असून देशाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवणारे द्रष्टे राजकारणी देखील होते. देशातील जलनिती बाबद त्यांनी त्या काळात केलेले कार्य आणि मांडलेले विचार हे किती महत्वाचे होते याची प्रचिती येते. स्वातंत्र प्राप्ती नंतर अनेक राज्या राज्या मध्ये पाणी प्रश्नावरून वाद निर्माण होत असल्याचे आपण बघतो. या प्रश्नाच्या बाबतील बाबासाहेबांनी त्या काळी...

नद्यांच्या पाणी वापराचे वाटपाचे विषय वारंवार उद्भवू शकतात त्यासाठी आंतरराज्यीय–आंतरराष्ट्रीय करार करावे लागतात. ते राज्य सरकार करू शकणार नाहीत त्यात केंद्र सरकारलाच लक्ष घालून प्रश्न सोडवावे लागतील. यदाकदाचीत राज्या राज्यांमध्ये, देशा देशामध्ये पाण्याच्या वापरावरून संघर्ष उद्भवले तर ते सोडवण्याचे काम केंद्र सरकारलाच करावे लागेल. राज्य सरकार हे काम करू शकणार नाही. तेव्हा पाणी हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारीत असणे आवश्यक आहे. अशी अत्यंत दुरदृष्टीची भुमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतील होती. देशाच्या पाण्याचा इतका दुरगामी सर्वंकष विचार फार कमी लोकांनी केला.

पाणी प्रश्नाबाबत बाबासाहेबांची भुमिका :–

पाणी हे प्रवाही आहे, ते चल असल्यामुळे उताराच्या दिशेने वाहत जाते. त्यामुळे जमीन हा विषय जरी राज्य सरकारच्या अखत्यारीत असला तरी पाणी हा विषय मात्र राज्य सरकारच्या अखत्यारीत ठेवू नये, कारण देशातल्या बऱ्याच नदया हया आंतरराज्यीय (उदा. गोदावरी, कृष्णा, कावेरी, तापी, नर्मदा, रावी, सतलज इत्यादी) आणि आंतरराष्ट्रीय (उदा. गंगा, ब्रम्हपुत्रा, सिंधू इ.) आहेत. डॉ. बाबासाहेबांनी मांडलेल्या त्यांच्या पाणी वाटप भुमिकेला आणि विचारांना त्यावेळी दुर्देवाने कोणीही फारशी साथ दिली नाही. त्यामुळे राज्यघटनेत पाणी हा विषय राज्याच्या अखत्यारीत राहिला. त्याचे फळ देशाला काय मिळालीत ते आपण आजही अनुभवत आहोत. गंगा कावेरी जोड प्रकल्पाचा विषय असेल, महाराष्ट्र–कर्नाटक कृष्णा पाणी तंटा असेल. आजही पाणी विषयावरील गुंतागुंत देशात कायम आहे. पाणी प्रश्ना बाबतीत सर्वंकष विचार करणाऱ्यांमध्ये बाबासाहेब अग्रस्थानी होते. देशाच्या शेती आणि उद्योग या दोन्ही महत्वाच्या आर्थिक क्षेत्राच्या विकाससाठी अत्यावश्यक असणारी सिंचन व ऊर्जा ही दोन्ही महत्वाची पायाभूत क्षेत्रे विकसीत करण्याचा पाया घातला गेला तो बाबासाहेबांच्या व्यावहारीक ज्ञानामुळेच. बाबासाहेबांना दलितांचे कैवारी, घटनाकार एवढ्या मर्यादेत न ठेवता त्यांचे राष्ट्र निर्मितीतील योगदान अत्यंत मोलाचे आहे. विशेषतः पाण्याचे नियोजन, विद्युत ऊर्जा, धरणे आणि आर्थिक नियोजन यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अलौकीक कार्यकर्तुत्व दुर्लक्षित राहिले आहे. देशातील वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने पाणी आणि ऊर्जा ही संशाधने विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहेत ही बाब ओळखून १९४२ ते १९४६ ला एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य असतांना त्यांच्याकडे असलेल्या सार्वजनीक बांधकाम, सिंचन व ऊर्जा या खात्यांच्या प्रशासकीय आस्थापनेच्या रचनेत त्यांनी आमुलाग्र बदल केला व देशाला जलनितीची तीन सुत्रे दिली १. ज्यात शेती, सिंचन, पिण्यासाठी पाणी ओद्योगीक विकास योजनांसाठी, जलवाहतूक, वीजनिर्मिती चे उद्दिष्ट २. जलप्रकल्पांची उभारणी करण्यासाठी नदी खोरे प्राधिकरण ३. जलसंपत्ती आणि ऊर्जा क्षेत्रासाठी केंद्रस्तरावर कुशल तंत्रज्ञांच्या गटाची निर्मिती ही आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जलनितीचा फायदा देशातील नदीखोरे प्राधिकरणाच्या माध्यमातून बहुउद्देशीय प्रकल्पांच्या नियोजनाचा पाया रचला गेला. त्यातूनच दामोदर खोरे योजना, सोन नदी खोरे विकास योजना, महानदी व कोसी नदी खोरे विकास योजना फलद्रूप झाल्या. बहुउद्देशीय अशा मोठ्या प्रकल्पांची रचना करण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी अमरीकेतील टेनिस व्हॅली योजनेचा संपूर्ण स्वतः अभ्यास केला. धरणांच्या संकल्पना, धरणांचे प्रकार स्वतः अभ्यासले, त्या बाबतीतले सर्व तंत्रज्ञान समजावून घेतले. सोन नदी खोरे प्रकल्प हा असाच बहुउद्देशीय प्रकल्प बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली पुर्ण झाला. अमेरीकेतील खोऱ्याच्या उपाययोजनांच्या अभ्यासातून ओरीसा राज्यातील हिराकुंड धरण जगातील सर्वात मोठे धरण ठरले असून याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दुरदर्शी नेतृत्वाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चिंतनातून या देशातील केवळ दलित आदिवासींच्या प्रश्नांची सोडवणूक केली असे नाही तर देशाच्या सर्वांगीण विकासात पायाभूत गोष्टींवर भर देऊन दिर्घकालीन विकास योजना पूर्ण करून, सामाजिक समतोल राखण्याचे काम त्यांनी केले आहे. अशा महामानवाच्या दुरदृष्टी आणि कार्याला कोटी कोटी अभिवादन.

**चेतनकुमार उईके**
**मुख्याध्यापक जि.प. वरिष्ठ प्राथमिक शाळा**
**पिंडकेपार ता. देवरी**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# १२ तास वीजपुरवठ्यासाठी शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन



**गोरेगाव :–** तालुक्यातील तेढा उपकेंद्रांतर्गत पठानटोला कृषी फिडरवरून परिसरातील शेतकऱ्यांना ८ तास वीजपुरवठ्याऐवजी १२ तास वीजपुरवठा कृषीपंपासाठी करण्यात यावा, या मागणीसाठी बुधवारी (दि. २) शेतकऱ्यांनी उपकेंद्रातील आवारात ठिय्या आंदोलन केले. कृषीपंपांना १२ तास वीजपुरवठा करा; अन्यथा, नुकसानभरपाई द्या, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

पठाणटोला कृषी फिडर अंतर्गत २० ते २५ गावे येतात. मात्र, या परिसरातील शेतकऱ्यांना वीज वितरण कंपनीकडून कृषी पंपासाठी सध्या रात्री दोन ते सकाळी दहा वाजेपर्यंत आठ तास वीजपुरवठा केला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्री–बेरात्री धानपीक जगविण्यासाठी शेतात जावे लागते. तेढा उपकेंद्रातील अनेक गावे ही नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला लागून असल्याने रात्री–बेरात्री शेतीच्या कामासाठी जाताना शेतकऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिसरात मोठ्या प्रमाणात बिबट, रानडुक्कर आणि वन्यप्राण्यांचा वावर असतो. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात यापूर्वी शेतकरी जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे या परिसरात १२ तास वीजपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी वारंवार महावितरणकडे करण्यात आली. पण, त्याची अद्यापही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी या मागणीला घेऊन महावितरणच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

## तेढा उपकेंद्रातील प्रकार

### शिष्टमंडळात यांचा समावेश

**डॉ. विवेक मेंढे, एल.पी. रहांगडाले, खुमेंद्र मेंढे, सुरेंद्र रहांगडाले, गणेश्वर मेंढे, पुरुषोत्तम ब्राह्मणकर, किशोर मारबते, देवा नाईक, महेश घासले, कैलास ब्राह्मणकर, रवींद्र चौधरी, सावलराम मुनेश्वर, हिरालाल रहांगडाले, बैंकट मेंढे, फुलवंता ब्राह्मणकर, शांता आस्वले, हेमराज मेंदे, प्रभाकर मेंढे, रविशंकर हुकरे, रवींद्र मेंढे, रामकिशोर मेंढे, मनोज मेंढे, गजानन मुनेश्वर, सौरभ बीजेवार, गणराज पाटील यांचा समावेश होता.**

### पठानटोला फिडरचा पुरवठा पूर्ववत करा

**पठाणटोला कृषी फिडरवरून शेतकऱ्यांना रब्बी हंगाम सन २०२४–२५ मध्ये १२ तास वीजपुरवठा देण्यात आला होता. त्या अनुषंगाने शेतकऱ्यांनी रब्बी पिकाचे नियोजन केले. मात्र, १ एप्रिल २०२५ पासून चीज वितरण कंपनीने पठाणटोला कृषी फिडरचे शेड्युल बदलवून रात्री दोन वाजेपासून ते सकाळी दहा वाजेपर्यंत केले. त्यामुळे शेतकऱ्यांना फक्त ८ तास वीज मिळत आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने थानाला पाणी जास्त लागते. तसेच रात्रीच्या वेळेत शेतकऱ्याला आपल्या शेतात जाण्याकरिता अडचणींचा सामना करावा लागतो. पठानटोला कृषी फिडरच्या शेतकऱ्यांच्या शेताला लागून घनदाट जंगल आहे. त्यामुळे वीज वितरण कंपनीने पठानटोला कृषी फिडर पूर्ववत वेळेनुसार चालू करावे, अशी मागणी केली.**

# वाहन चालकांवर आता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर !

## वाहतुकीचे नियम मोडणे पडेल महागात:सहा मुख्य ठिकाणी लागणार सीसीटीव्ही कॅमेरे

**गोंदिया :–** वाहन चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याची शिस्त लागावी, वाहतुकीच्या नियमांचे उल्लघंन होऊ नये, वाढत्या अपघातांना आळा बसावा यासाठी वाहतूक नियंत्रण विभाग, उपप्रादेशिक परिवहन विभागाने जिल्हा प्रशासनाच्या मदतीने पावले उचलली आहे. शहरातील सहा मुख्य ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहे. जिल्हा नियोजन समितीअंतर्गत निधी उपलब्ध करून दिला जाणार असून वाहन चालकांना आता नियमांचा भंग करणे चांगलेच महागात पडणार आहे.

गोंदिया शहरातील वाहतुकीला शिस्त नसल्याने अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. तसेच शहरातील काही मुख्य ठिकाणाहून दुचाकी चोरीच्या घटनांमध्येसुद्धा वाढ झाली आहे. या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी प्रशासनाने पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शहरातसुद्धा हेल्मेट सक्ती केली जाणार आहे. वाहन चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे यासाठी शहरातील सहा मुख्य ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या कॅमेऱ्यांच्या मदतीने वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्यावर थेट दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. नियमाचे उल्लघंन करणाऱ्या वाहन चालकाला त्याच्या मोबाइलवर ई–चालान पाठविले जाणार आहे. तसेच दुचाकी चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठीसुद्धा हे सीसीटीव्ही कॅमेरे महत्त्वाची भूमिका पार पडणार आहे. यासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी मंजूर करण्यात आला असून लवकरच सीसीटीव्ही लावण्याचे काम सुरू केले जाणार आहे. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणे वाहन चालकांना आता चांगलेच महागात पडणार आहे.



### या सहा ठिकाणी लागणार सीसीटीव्ही

**शहरातील जयस्तंभ चौक, फुलचूर चौक, बालाघाट टी पॉइंट चौक, पाल चौक, कुडवा चौक, सारस चौक या सहा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वेक्षणसुद्धा पूर्ण झाले आहे. तर निधी मंजूर झाला असल्याने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची अडचण दूर झाली आहे.**

### वेगवान वाहनावर रडार वाहनाची नजर

**गोंदिया उपप्रादेशिक परिवहन विभागाला रडार वाहन प्राप्त झाले आहे. हे वाहन चोवीस तास शहरातील फुलचूर चौकात तैनात राहणार आहे. या वाहनातील रडाराच्या मदतीने वेगवान वाहनावर नजर ठेवून त्यांच्यावर वेळीच कारवाई केली जाणार आहे. या वाहनात दोन मोटार वाहन निरीक्षकसुद्धा तैनात राहणार असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसरकर यांनी दिली.**

# जिल्हा बँक निवडणुकीसाठी मोर्चेबांधणीला आला वेग

## कर्जदार गटातील एका व्यक्तीला मतदानाचा अधिकार : जुळवाजुळव सुरू २० संचालकपदासाठी ही निवडणूक होणार आहे

**गोंदिया :–** जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळासाठी निवडणूक घेण्यात येणार आहेत. त्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यंदा सेवा सहकारी संस्थांतील कर्जदार गटातील एका व्यक्तीला मतदान करण्याचा अधिकार राहणार आहे. त्यासाठी संस्थेने त्या प्रतिनिधीचे नाव ठरावाद्वारे ठरवून द्यायचे आहे. त्यासाठी देवरी तालुक्यात काही व्यक्तींनी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे.



### आमसभेतून निवड करा

**संचालक मंडळाच्या बैठकीत कर्जदार गटातून मतदाराची निवड न करता आमसभेतून सर्वानुमते निवड करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. या प्रकारामुळे मात्र देवरी तालुक्यातील सहकार क्षेत्रातील वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे.**

शेतकऱ्यांची हक्काची बँक म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे बघितले जाते. जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर मजबूत पकड ठेवण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर सत्ता असणे गरजेचे आहे. तसेच राजकीयदृष्ट्या सुद्धा महत्त्व आहे. गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेला वेग आला आहे. काही तांत्रिक अडचणीमुळे गेल्या १३ वर्षापासून निवडणूक प्रकिया रखडली होती. पण उच्च न्यायालयाने सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर आता निवडणूक हालचालींना वेग आला आहे, तर या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी सुद्धा मोर्चे बांधणीला सुरुवात केल्याचे चित्र आहे. एकूण २० संचालकपदासाठी ही निवडणूक होणार असून यासाठी जवळपास १२५० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. सेवा सहकारी संस्थांमधील कर्जदार गटातील एका सदस्याला मतदानाचा अधिकार असणार आहे. त्याकरिता संस्थेला त्या सदस्याच्या नावावर शिक्कामोर्तब करून तसा ठराव सहकार विभागाला द्यावा लागणार आहे. त्यासाठी आता गावागावांतील सेवा सहकारी संस्थांत कुणाला मतदानाचा अधिकार द्यायचा, यासाठी चढाओढ सुरू झाली आहे.

# पाटबंधारे विभागात अभियंत्यांची टंचाई

## शेतकरी अडचणीत : रिक्तपदे भरण्याकडे दुर्लक्ष

**तिरोडा :–** पाटबंधारे विभागाचे उपअभियंता कार्यालय येथे असून, या कार्यालयांतर्गत अनेक मोठे तलाव व प्रकल्प कार्यरत आहेत. परंतु, या विभागात अभियंत्यांची टंचाई असल्याचे समोर आले आहे.



शासनाने या विभागासाठी पाच अभियंता पदे मंजूर केली असली, तरी सद्यस्थितीत फक्त एकच अभियंता कार्यरत आहे. उर्वरित पदे रिक्त असल्यामुळे संपूर्ण विभागाच्या व्यवस्थापनाचा भार या एकाच अभियंत्यावर आहे. यामुळे सिंचन व्यवस्थापन आणि पाण्याच्या योग्य वितरणात अडचणी निर्माण होत आहेत. गोंदिया जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी भातशेती करतात. भातशेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. तलाव आणि पाटबंधारे प्रकल्पांमधून योग्य व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे पाणी वेळेवर मिळू शकते. मात्र, अभियंत्यांची अनुपलब्धता यामध्ये मोठी अडचण ठरत आहे. जर लवकरात लवकर पाटबंधारे विभागात मनुष्यबळ वाढवले नाही, तर पावसाळ्यानंतर पाण्याचे योग्य नियोजन होऊ शकणार नाही. परिणामी, सिंचनासाठी शेतकऱ्यांना पाण्याची टंचाई भासेल आणि त्यांच्या उत्पादनावर विपरित परिणाम होईल.

**एक अभियंता, जबाबदाऱ्या अनेक**

एका अभियंत्यावर अनेक तलावांचे व्यवस्थापन, जलनियोजन, देखभाल–दुरुस्ती आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींची सोडवणूक यासारख्या जबाबदाऱ्या आहेत. एवढ्या मोठ्या क्षेत्रावर नियंत्रण ठेवणे आणि शेतकऱ्यांच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करणे हे अत्यंत कठीण आहे.

## ग्राम पंचायत कार्यालय कोरंभी
## पंचायत समिती अर्जुनी/मोर.जि.गोंदिया

क्र.ग्रापसि/निविदा/ २०२५ दिनांक:– ०८/०४/२०२५

### निविदा सूचना क्र-१ (पहिली वेळ) सन १०२५-२६

ग्रा.पं.कार्यालय कोरंभी पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया येथे १५ वा वित्त आयोग अंतर्गत कामे सन २०२२–२३ अंतर्गत खालील विवरण पत्रामधील पुर्ण बांधकामाचे निविदा महाराष्ट्र शासन तरतुदीच्या अधिन राहून यथायोग्य श्रेणीत पंजीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पद्धतीने निविदा मागवित आहेत.

**:–कामाचे विवरण–:**

| अनु.क्र. | कामाचे नाव | कामाचे अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजा कोरंभी येथे ग्रा.पं. परिसरात विंधन विहीर खोदकामव हातपंप/विद्युतपंप उभारणीकाम करणे | १३०४९६/– | ५००/– | १३०५/– | ६ महिने |

**:–निविदेचे वेळापत्रक–:**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्ध दिनांक | दि.०९/०४/२०२५ |
| २ | निविदा दाखल करण्याची सुरुवाती दिनांक | ०९/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ पर्यंत |
| ३ | निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | १६/०४/२०२५ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ४ | निविदा उघडण्याचा शक्यतो दिनांक | १७/०४/२०२५ किंवा पुढील होणाऱ्या मासिक सभेत |

(सदर निविदेची विस्तृत माहिती व अटी शर्ती ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर बघायला मिळेल.)

**सरपंच** — **ग्राम पंचायत कोरंभी**
**ग्राम पंचायत अधिकारी** — **ग्राम पंचायत कोरंभी**

# योग प्रशिक्षणाच्या नावावर ८ ६ लाखाची अफरातफर,जि.प.सदस्य घाटबांधे यांचा आरोप

**अर्जुनी/मोरगाव :** जिल्हा परिषदेत सन २०२२–२०२३ जिल्हा वार्षिक योजनामध्ये अनुसुचित जाती महिला, प्राध्यापिका व विद्यार्थीनीना कौशल्य प्रशिक्षण ज्युडो कराटे व योग अंतर्गत ८५ लाख रुपये खर्च करून ८५०० लाभार्थीना प्रशिक्षण द्यायचे होते. मात्र तत्कालीन जि. प. अध्यक्ष तथा महिला व बालकल्याण सभापती तथा विभागाचे अधिकारी यांनी आपल्या पसंतीच्या एका खाजगी संस्थेला कंत्राट देवून सुमारे ८५ लाख रुपयाचा अफरातफर केल्याचा आरोप जि. प. सदस्य श्रीकांत घाटबांधे यांनी आयोजित पत्र परिषदेत केला आहे. या प्रकराने जि. प. वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे.

गोंदिया जिल्ह्यात महिला व बालकल्याण विभागाद्वारा अनुसुचित जातीच्या मुली, महिला, प्राध्यापिका यांना जुडो कराटे, योग व जिवन कौशल्य विकास प्रशिक्षण सन २०२२–२०२३ मध्ये जिल्ह्यातील अनेक शाळांमधिल मुलींना, महिलांना, प्राध्यापिकांना १२० तासाचे प्रशिक्षण पुरविले. असा अहवाल मातोश्री बहुउदेशिय संस्था नागपूर (एन.जी.ओ.) यांनी व इतर संस्थानी देयके सादर केला. त्यावर सदर संस्थेला ३९ लाख रुपयाचे देयके देण्यात आले. जिल्हा तायक्वांडो असोशियन, गणपती मेश्राम, श्रृष्टी निवास पांडे ले आऊट अंगूर बगीचा गोंदिया या संस्थेला २९ लाख रुपयाचे देयके देण्यात आले. डी. जी. एम. तायक्वांदो क्रीडा शिक्षण आणि युवा अकादमी डी. जी. मेश्राम ह. मु. वांदेरा पो. निलज ता. देवरी जिल्हा गोंदिया यांचे संस्थांना १७ लाखाचे देयक दिले. सदर संस्थांना अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत जुडो कराटे, योगा व जिवन कौशल्य प्रशिक्षण देण्याचे काम उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. गोंदिया आणि महिला व बालकल्याण समिती यांचे संगनमताने कामे देण्यात आली. या मुद्द्यांवर चौकशी करावी. अशी मागणी जि प सदस्य श्रीकांत घाटबांधे यांनी केली.

यावर कारवाई न झाल्यास महिला व बाल कल्याण विभागाच्या आयुक्तांना सर्व पुराव्यांशी तक्रार करून जन आंदोलन उभारणार, असा इशारा आयोजित पत्र परिषदेत जि.प. सदस्य श्रीकांत घाटबांधे यांनी दिला. याप्रकारानेजि. प. वतुर्ळात एकच खळबळ उडाली असून संबंधित प्ररणाची चौकशी होणार का? याकडेही लक्ष लागले आहे.

# चिचगड उपकेंद्राअंतर्गत भारनियमन बंद करून अखंडीत विद्युत पुरवठा करा



**देवरी –** स्थानिक अनेक वर्षांपासून संपूर्ण देवरी तालुका महावितरणच्या सततच्या जाचक त्रासाला समोर जात असून महावितरण कडून होणारे आर्थिक,सामाजिक,भौतिक आणि शारीरिक शोषण सहन करत आहेत. परंतु या परिस्थितीमद्ये शेतकऱ्यांचे मोठे बिकट हाल निर्माण झालेत असून देवरी तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्युत विभागाच्या अडचणी सोडविण्यासाठी देवरी येथील महावितरण च्या विभागीय कार्यालयाला घेराव करून कार्यकारी अभियंता फुलझले यांना उपसभापती शालिकराम गुरुनुले,मगरडोह ग्राम पंचायत उपसरपंच देवविलास भोगारे,यशवंत गुरुनुले, गणेश तोफे,महेंद्र निकोडे, राजेश चांदेवार, विलास निकुरे, बाळकृष्ण गायधने,हंसराज हुकरे यांच्या नेतृत्वात उपस्थित नागरिकांसोबत निवेदन देण्यात आले.

या निवेदनात प्रामुख्याने महावितरणच्या चिचगड येथे असलेले उपकेंद्राअंतर्गत सर्व गावांमद्ये ४४० केव्ही विद्युत पुरवठा करण्यात यावा,चिचगड उपकेंद्र येथे १० केव्हीचे पॉवर ट्रान्सफार्मर उपलब्ध करून देण्यात यावे,या उपकेंद्राअंतर्गत सर्व गावांचे भारनियमन बंद करून नेहमी करिता अखंडित वीज पुरवठा करण्यात यावा,सन २०२५ पूर्वी कृषी पंपा करिता डिमांड भरलेल्या शेतकऱ्यांना कृषी विद्युत मीटर देण्यात यावे, चिचगड उपकेंद्राचे विद्यमान कार्यरत कनिष्ठ अभियंता यांच्या ऐवजी दुसऱ्या अभियंत्याची पदस्थापना करण्यात यावी आणि सर्व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहून नरिकांना नियमित विद्युत सुविधा देण्यासाठी सक्तीचे करावे आदी मागण्यांचा समावेश आहे.

या संदर्भात देवरी उपविभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याशी जवळ जवळ दोन तास साधक बाधक चर्चा करून तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागात निर्माण झालेल्या विद्युत अडचणीतुन मार्ग काढून त्यावर उपाययोजना कस करता येईल यावर नियोजन करून नागरिकांच्या मागण्या मान्य करून येत्या दोन दिवसात सर्व अडचणी मार्गी लाऊन देण्यात येईल असे लेखी आश्वासन कार्यकारी अभियंता यांनी दिले.या निवेदनाच्या शिष्टमंडळात चिचगड जिल्हा परिषद क्षेत्रातील कलिंद्र गुरूनुले,आसाराम पालीवाल, देवेंद्र गावळ, एकनाथ सोनुले,चिंधु निकोडे, हंसराज ठाकरे यांच्यासह ग्राम पालांदूर, मगरडोह,टेकरी,रामगड, सुकळी, ढोडरा, रोपा, सिंगनडोह,घोनाडी, बोन्डे,पळसगांव येथील असंख्य नागरिक उपस्थित होते.

## ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी
## पंचायत समिती गोरेगाव, जिल्हा गोंदिया

### जाहिर निविदा

**जा.क्रं.११/२०२५ जाहिरात प्रसिद्धी दिनांक :–०८/०४/२०२५**

सर्व साहित्य पुरवठा धारकांना सुचित करण्यात येते की, ग्राम पंचायत कार्यालय कुऱ्हाडी येथे सामान्य निधी, पाणी पुरवठा निधी, एम.जी.नरेगा, १५ वा वित्त आयोग व शासनाच्या विविध योजनेअंतर्गत सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाकरीता खालील प्रमाणे साहित्य लागणार आहेत. खालिल विवरणाप्रमाणे साहित्याची निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | दर या प्रमाणात सादर करावे |
|---|---|---|
| १ | **बांधकाम साहित्य** सिमेंट,रेती, लोहा ६,८,१०,१२ एम.एम.विटा, गिटा ८०,४० एम.एम., बजरी २० एम.एम., रोलर, टॅकर, इतर सर्व बांधकाम साहित्य, ग्रील, सिमेंट, चौकट, स्टिल चौकट | प्रती बॅग, ब्रास,नग, क्विंटल या प्रमाणे |
| २ | ब्लेचिंग पावडर, फिनाईल | प्रतिबॅग प्रतिलिटर |
| ३ | सिमेंट पाईप, कॉलर ३००,४५०,६०० mm | प्रतिनग |
| ४ | **विदयुत साहित्य** LED वल्ह २३ वॉट, वायर १mm,होल्डर,इ. डॅक्स,बॅच,दरी,छोटी प्लास्टिक चेअर, इत्यादी | प्रतिनग प्रतिनग |

**अटी व शर्ती:**–१. सदर साहित्याची निविदा ग्राम पंचायत कार्यालय कुऱ्हाडी येथे दिनांक १५/०४/२०२५ सायं.५.०० वाजे पर्यंत पोहचते करावे. नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. अमानात रक्कम १००० रुपये २. निविदा उघडण्याचा दिनांक शक्य झाल्यास १६/०४/२०२५ दुपारी ३:०० वाजता. ३. मंजूर निविदा दिनंक १६/०४/२०२५ पासून ते ३१/०३/२०२६ पर्यंत वैद्य राहिल. ४. सदर बिल टॅक्स GST रहित बिल स्विकारले जातील. ५. बाधकाम साहित्य जागेवर पोहचता करावे लागेल. ६. कोणत्याही कामाचे अग्रिम रक्कम मिळणार नाही. ७. बांधकाम साहित्य पुरवठा करतेवेळी गौण खनीज रॉयल्टी जोडणे आवश्यक आहे. ८. कोणतेही कारण न दर्शविता मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार सरपंच/ग्रापंअ यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी** — **ग्राम पंचायत कुऱ्हाडी**
**सरपंच** — **ग्राम पंचायत कुऱ्हाडी**

# बांध तलाव परिसरात ६६ फूलपाखरांच्या प्रजातींची नोंद

## संजय गजभिये यांचे संशोधन : पर्यावरणप्रेमींमध्ये आनंद

**गोंदिया :–** शहरातील बांध तलाव हे जैवविविधतेने नटलेले आहे. या परिसरात अनेक वनस्पती आहे. तालुक्यातील पांढराबोडी येथील जीईएस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.डॉ. संजय गजभिये यांनी बांध तलाव परिसरात ६६ फूलपाखरांच्या प्रजातींची नोंद घेतली आहे. तसेच यावर शोधप्रबंधसुद्धा तयार केला आहे. त्यांच्या संशोधनाने पर्यावरणप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

इंटरनॅशनल जनरल ऑफ क्रिएटिव्ह रिसर्च थॉट्स या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत प्रा. डॉ. संजय गजभिये यांनी याची नोंद केली आहे. त्यांनी फुलपाखरांच्या ६६ प्रजातींचे पाच कुटुंबांत विभाजन केले आहे. त्यात पॅपीलीओनिडी, पिरीडी, निम्फ्यालीडी, लायव्यानिडी व हेस्पीरिडी यांचा समावेश आहे. प्रा. गजभिये यांनी सप्टेंबर ते डिसेंबर २०२४ या कालावधीत बांध तलाव परिसरात फूलपाखरांचे हे संशोधन करून फूलपाखरांच्या ६६ प्रजातींची नोंद घेतली. एवढेच नव्हे तर फूलपाखरे नेमकी कुठल्या झाडावर अधिक आढळतात याचादेखील त्यांनी शोध घेतला. यात घाणेरी आणि पंचफुली या झाडांवर ८० टक्के फूलपाखरांची नोंद घेतली. त्याचे शास्त्रीय नाव लॅन्टाना कॅमरा (टिक बेरी) असे आहे. झाडांच्या फुलांचा रंग गुलाबी फिकट, पिवळा, पांढरा, तर काही केसरी आहे. या झाडाचे फळ जामूनी रंगाचे पक्षी खाताना प्रामुख्याने आढळतात. हे झाड औषधीयुक्तसुद्धा आहे. विशेष म्हणजे उन्हाळ्यातील तापमानाचा परिणामसुद्धा फूलपाखरांवर होतो.

### बांध तलाव परिसरात फूलपाखरांच्या अधिवासाची कारणे

**अधिक प्रमाणात पाणी उपलब्ध, खाद्य व प्रजननासाठी उपलब्ध झाडे, शेत शिवार, पोषक वातावरण, प्रदूषणमुक्त वातावरण, घाणेरी व पंचफुलीच्या झाडांचे अधिक प्रमाण यामुळे या परिसरात फूलपाखरांचा अधिवास आहे.**

**मला कीटकांचे संशोधन करण्यात रूची आहे. यापूर्वी मी पेंच व्याघ्र प्रकल्पात १४० बिटल्स किड्यांचा शोध घेतला. त्यानंतर गोंदिया येथील बांध तलाव परिसरात ६६ फूलपाखरांच्या प्रजातींची नोंद केली आहे. तसेच यावर शोधप्रबंधसुद्धा तयार केला आहे.**
**– प्रा. डॉ. संजय गजभिये, जीईस कनिष्ठ महाविद्यालय पांढराबोडी**



### फुलपाखरांचे संवर्धन गरजेचे

**फूलपाखरांना पर्यावरणसूचक असे म्हटले जाते. त्यामुळे त्यांचे संवर्धन करण्याची गरज आहे. यासाठी झाडांची कत्तल थांबविणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे, घाणेरी व पंचफुलीच्या झाडांची लागवड करण्यावर भर देणे, आदी उपाययोजना करण्याची गरज आहे.**

### या फुलपाखरांची नोंद

**कॉमन मॉरमॉन, कॉमन जॉय, कॉमन रोज, कॉमन इवेनिंग ब्राऊन, ग्रेट इवेनिंग ब्राऊन, कॉमन बारोन, लेमन पॅन्सी, पिकॉकपॅन्सी, ब्लू टायगर, प्लेन टायगर, कॉमन नवाब, रावनी राजा, ॲनामालस नवाब, झेब्रा ब्लू, डार्क ग्रास ब्लू, कॉमन सिल्वर लाईन, राईस स्वीफ्ट, प्लॅन कुपीड.**

## ग्रामपंचायत कार्यालय मोहगांव (बु.)
## पंचायत समिती गोरेगाव, जिल्हा गोंदिया

### जाहिर निविदा

**जा.क्रं.११/२०२५ जाहिरात प्रसिध्दी दिनांक :–०८/०४/२०२५**

सर्व साहित्य पुरवठा धारकांना सुचित करण्यात येते की, ग्राम पंचायत कार्यालय मोहगांव (बु.) येथे सामान्य निधी, पाणी पुरवठा निधी, एम.जी.नरेगा, १५ वा वित्त आयोग व शासनाच्या विविध योजनेअंतर्गत सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाकरीता खालील प्रमाणे साहित्य लागणार आहेत. खालिल विवरणाप्रमाणे साहित्याची निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | दर या प्रमाणात सादर करावे |
|---|---|---|
| १ | **बांधकाम साहित्य** सिमेंट,रेती, लोहा ६,८,१०,१२ एम.एम.विटा, गिटा ८०,४० एम.एम., बजरी २० एम.एम., रोलर, टॅकर, इतर सर्व बांधकाम साहित्य, ग्रील, सिमेंट, चौकट, स्टिल चौकट | प्रती बॅग, ब्रास,नग, क्विंटल या प्रमाणे |
| २ | ब्लेचिंग पावडर, फिनाईल | प्रतिबॅग प्रतिलिटर |
| ३ | सिमेंट पाईप, कॉलर ३००,४५०,६०० mm | प्रतिनग |
| ४ | विदयुत साहित्य LED वल्ह २३ वॉट, वायर १mm,होल्डर,इ. डॅक्स,बॅच,दरी,छोटी प्लास्टिक चेअर, इत्यादी | प्रतिनग प्रतिनग |
| ५ | अभ्यासिका तयार करणे १५ वित्त आयोग | संपूर्ण काम सिलींग (पीव्हीसी, पुटींग,फर्निचर,लाईट फिटींग, २ फॅन,रुम पेन्टींग इतर) अंदाजित २.५० लक्ष |

**अटी व शर्ती:**–१. सदर साहित्याची निविदा ग्राम पंचायत कार्यालय मोहगांव (बु.) येथे दिनांक १५/०४/२०२५ सायं.५.०० वाजे पर्यंत पोहचते करावे. नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. अमानात रक्कम १००० रुपये २. निविदा उघडण्याचा दिनांक शक्य झाल्यास १६/०४/२०२५ दुपारी ३:०० वाजता. ३. मंजूर निविदा दिनंक १६/०४/२०२५ पासून ते ३१/०३/२०२६ पर्यंत वैद्य राहिल.४. सदर बिल टॅक्स GST रहित बिल स्विकारले जातील.५. बाधकाम साहित्य जागेवर पोहचता करावे लागेल. ६. कोणत्याही कामाचे अग्रिम रक्कम मिळणार नाही. ७. बांधकाम साहित्य पुरवठा करतेवेळी गौण खनीज रॉयल्टी जोडणे आवश्यक आहे. ८. कोणतेही कारण न दर्शविता मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार सरपंच/ग्रापंअ यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी** — **ग्रामपंचायत मोहगांव (बु.)**
**सरपंच** — **ग्रामपंचायत मोहगांव (बु.)**

# गोंदिया-बल्लारशाह रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाला मंजुरी

**गोंदिया :-** केंद्र सरकारने रेल्वेसाठी अनेक मोठ्या प्रकल्पांची घोषणा शुक्रवारी (दि. ४) केली आहे. या रेल्वे प्रकल्पांना मंत्रिम ंडळानेही मान्यता दिली आहे. यात गोंदिया-बल्हारशाह रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणासाठी ४८१९ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे.त्यामुळे अनेक वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी लागला आहे.







केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी शुक्रवारी गोंदिया-बल्लारशाह रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरण प्रकल्पास मंजुरी दिल्याची घोषणा केली. या प्रकल्पाला तत्कालीन खा. सु-नील मेंढे यांच्या कार्यकाळात डीपीआरला मंजुरी देण्यात आली होती. यासाठी ४,८१९ कोटी रुपये खर्च येणार आहे. या लोहमार्गाची लांबी २४० किमी आहे. नुकतेच वडसा-गडचिरोली रेल्वे मार्गास मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे पोलाद नगरी असलेला गडचिरोली जिल्हा मोठ्या प्रमाणावर रेल्वेच्या नकाशावर आल्यामुळे खनिज पोलाद आणि प्रक्रिया केलेले लोखंडी मालवाहतूक सोइची होईल.

### चारही जिल्ह्यांसाठी ठरणार वरदान

**उत्तर भारत व पूर्व भारत दक्षिण भारताशी जोडणारा हा रेल्वे मार्ग खूप सोयीचा झाल्यामुळे वरील क्षेत्रातील प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सोयीची झाली आहे. या चारही जिल्ह्यामधील खनिजे कोळसा मँगनीज व पोलादाची माल वाहतूकदेखील मोठ्या प्रमाणावर गतिमान होणार आहे. त्यामुळे हे दुहेरीकरण या चारही जिल्ह्यांच्या विकासाला वरदान ठरेल.**

### ही आहेत या प्रकल्पाची वैशिष्ट्ये

**लाभार्थी जिल्हे : गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर.**
**एकूण रेल्वे स्थानके : २१**
**पूल : ४८ मोठे पूल, ३४९ छोटे पूल, १४ आरओबी, १८४ आरयूबी, ५ रेल्वे उड्डाणपूल**
**रेल्वे मार्गाची लांबी : २७८ किमी मार्गाची लांबी; ट्रॅकची लांबी ६१५ किमी**
**डिझेलची बचत : दरवर्षी २२ कोटी लिटर**
**लॉजिस्टिक्स खर्चात बचत: दरवर्षी २५२० कोटी**

# रेलटोली येथील मालधक्का शहराबाहेर हटवा

## राजेंद्र जैन : रेल्वे महाव्यवस्थापकांना दिले निवेदन

**गोंदिया:-** दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक (डीआरएम ) डी.बी.गुप्ता हे शनिवारी (दि.५) गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. अमृत भारत स्टेशन योजनेत गोंदिया रेल्वे स्थानकाचा समावेश आहे. यातंर्गत रेल्वे स्थानकाचे आधुनिकरण केले जात आहे. याकामाची पाहणी करण्यासाठी ते आले होते. यावेळी माजी आ.राजेंद्र जैन यांनी त्यांची भेट घेवून शहरातील रेलटोली परिसरातील मालधक्का शहराबाहेर हटविण्याची म ागणी केली. तसेच विविध मागण्यांचे निवेदन देत त्यांचे समस्यांकडे लक्ष वेधले.

रेलटोली परिसरातील रेल्वे मालधक्क्यामुळे या परिसरात नेहमीच वाहतूक कोंडी होते. तर याच मार्गावर शाळा महाविद्यालय असल्याने विद्यार्थ्यांना सुध्दा याचा फटका बसतो. यामुळे अपघातांच्या संख्येत सुध्दा वाढ झाली आहे. त्यामुळे या मालधक्क्याचे शहराबाहेर स्थानांतरण करण्यात यावे अशी म ागणी शिक्षण संस्था आणि रामनगर पोलिसांनी सुध्दा केली आहे. गोंदिया रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशव्दाराकडे जाणारा मार्ग अरुंद फारच अरुंद असल्याने प्रवाशांची गैरसोय होते. त्यामुळे गुजराती सम ाजवाडी, रेल्वे विश्रामगृह मार्गावरील भिंत फोडून रस्ता तयार करण्यात यावा. याचे अनेकदा सर्वेक्षण करण्यात आले मात्र अद्यापही हा प्रश्न मार्गी लावण्यात आला नाही. याकडे सुध्दा माजी आ.जैन यांनी डीआरम गुप्ता यांचे लक्ष वेधले. रेल्वे तलावाचे सौंदर्यीकरण, नागपूर-बिलासपूर मार्गावरील तिरोडा रेल्वे स्थानकावर दिव्यांग प्रवाशांसाठी रॅम्प, स्वयंचलित वाहन, फलाटावर डिस्प्ले बोर्ड, पार्किंग झोन व फ लाट क्रमांक २ वर उपहारागृहाची व्यवस्था करण्याची मागणी केली.



### या रेल्वे गाड्यांना थांबे द्या

**एल.टी.टी.पुरी सुपर फॉस्ट एक्सप्रेसला, हावडा-मुंबई दुरांतो एक्सप्रेस, हावडा पुणे दुरांतो एक्सप्रेसला गोंदिया रेल्वे स्थानकावर थांबा देण्यात यावा. गोडवाना एक्सप्रेस, रिवा इतवारी एक्सप्रेस तिरोडा रेल्वे स्थानकावर थांबा देण्यात यावा.**

### रेल्वे स्थानकावरील कामे दर्जेदार करा

**खा. प्रफुल्ल पटेल यांच्या पाठपुराव्यामुळे गोंदिया रेल्वे स्थानकाचा अमृत भारत स्टेशन योजने समावेश होवून ३६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. रेल्वे स्थानकावर बरीच कामे सुरु असून ती कामे दर्जेदार व्हावी याकडे लक्ष देण्याची मागणी माजी आ. जैन यांनी डीआरएम यांच्याकडे केली. रेल्वे स्टेशन पार्किंग परिसर, रेस्ट हाऊस व दुर्गा चौक परिसरात हायमास्ट लाईट लावण्यात यावे. तसेच या परिसरात रेल्वे सुरक्षा बलाचे पोलिस कर्मचारी तैनात करण्यात यावे अशी मागणी केली.**

# जिल्ह्यातील १३३ मत्स्यपालन संस्थांना लागली अखेरची घरघर

## सरकारकडे वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष



**गोंदिया-** जिल्ह्यात ढिवर समाज मोठ्या संख्येने आहे. या समाजाचा पारंपरिक व्यवसाय मासेमारीच आहे. आजही हा समाज अशिक्षित असून त्यांची ओळख हाच व्यवसाय आहे. सरकारने मासेमारीचा अधिकार दिला असला तरी प्रत्यक्षात काही मोठ्या व्यक्तींनी या अधिकारांवर कब्जा केला आहे.

त्यामुळे या समाजातील सदस्यांना त्यांच्या नियंत्रणाखाली मासेमारी करावी लागते. सरकारकडे वारंवार मागण्या करूनही त्यावर उपाययोजना होत नसल्यामुळे हा समाज दिवसेंदिवस अधिकच मागास होत चालला आहे.

गोंदिया. तलाव, वनसंपत्ती व जैवविविधतेने समृद्ध मानला जाणारा गोंदिया जिल्हा सध्या पारंपरिक व्यवसायाच्या ऱ्हासाच्या उंबरठ्यावर आहे. या स्थितीला शासनाच्या उदासीन प्रशासनाला जबाबदार धरले जात आहे. दुग्धव्यवसाय व पशुपालनानंतर आता संयुक्त व्यवसाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मासेमारी व्यवसायावरही संकटात आहे. शासनाच्या निर्षक्रयतेमुळे जिल्ह्यात ६७७८ अनुकूल जलस्रोत असतानाही १३३ मत्स्यपालन संस्था मोडकळीस आल्या आहेत. गोंदिया जिल्ह्याला मतलावांचा जिल्हा म्हणून ओळ-खले जाते. यामुळे पूर्वी येथे मासेमारी व्यवसाय चांगल्या स्थितीत होता. विशेषतः ढिवर, कहार आणि इतर काही पारंपरिक

| तालुका | क्षेत्र | हेक्टर |
|---|---|---|
| तिरोडा | 951 | 2338 |
| गोरेगाव | 936 | 2490 |
| गोंदिया | 293 | 2269 |
| आमगाव | 604 | 431 |
| सालेकसा | 1250 | 3901 |
| सडक अर्जुनी | 420 | 1219 |
| अर्जुनी मोरगाव | 563 | 7855 |
| देवरी | 761 | 1392 |

जातींच्या सुमारे १० टक्के कुटुंबांचा उदरनिर्वाह हाच व्यवसाय होता. मात्र, सरकार व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जिल्ह्यात भूजल आधारित मासेमारी व्यवसायावर संकट गडद होऊ लागले आहे. येथे मत्स्यपालनासाठी भरपूर जलसंपत्ती असूनही सरकार व प्रशासनाकडून केवळ नावालाच योजना राबविल्या जात आहेत. त्यामुळे हा व्यवसाय कधी नैसर्गिक आपत्तीमुळे, तर कधी धोरणात्मक अडचणींमुळे डबघाईस येत आहे. या व्यवसायावर अवलंबून असलेल्या लाखो कुटुंबांना आता रोजगारासाठी पारंपरिक व्यवसायांपासून दूर जावे लागत आहे.

परिणामी,जिल्ह्यात बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढत आहे. तसेच प्रशासनानी जिल्ह्यातील रोजगारवाढीसाठी अद्याप कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत. लघुउद्योगांना चालना देण्यासाठीही कोणत्याही उपाययोजना

खासगी ठेकेदारांच्या ताब्यात जिल्ह्यातील मत्स्य सहकारी संस्थांच्या माध्यमातून मासेमारीचा व्यवसाय चालवला जातो. मात्र सध्या या व्यवसायाला उतरती कळा लागल्याने अनेक संस्था कोसळू लागल्या आहेत. जिल्ह्यात एकूण १३३ संस्था असून त्यांचे एकूण सदस्य १०४४१ आहेत. यापैकी काही संस्था खासगी ठेकेदारांच्या ताब्यात गेल्यामुळे त्या संस्था केवळ कागदोपत्री अस्तित्वात आहेत.

### ग्रामीण आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन

अमरावती :अ. भा. आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन महामंडळाचे सहावे ग्रामीण आंबेडकरी साहित्य संमेलन हिवरा (बु), ता. नांदगाव खंडेश्वर येथे दिनांक ११ एप्रिल रोजी आयोजित करण्यात येणार आहे. संमेलनाध्यक्षपदी डॉ. नंदा तायवाडे तर उदब घाटकपदी प्रा. विलास भवरे यांची निवड करण्यात आल्याची माहिती महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे यांनी दिली आहे.ग्रामीण कलावंतांना विचारमंच उपलब्ध व्हावा आणि सरकारी अनास्थेमुळे ग्रामीण भागात निर्माण झालेल्या समस्यांवर चर्चा व्हावी यासाठी सदर संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रशांत वंजारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे कळवले आहे.

संमेलनात दिवसभर भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून त्यात कथाकथन, विधान चर्चा, कवी संमेलन, एकपात्री नाट्य प्रयोग, परिसरातील कार्यकर्त्यांचा सन्मान आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. संमेलनात डॉ. वामन गवई, डॉ. भास्कर पाटील, डॉ. सिद्धार्थ वाठोरे, प्रा. विक्रांत मेश्राम, भाऊ भोजणे, डॉ . सीमा मेश्राम, संजय शेजव आदी मान्यवर सहभागी होणार आहेत.

# सुगंधित तंबाखूची वाहतूक करणारे वाहन पकडले,१४.६० लाखांचा माल केला जप्त

**गोंदिया :** सुगंधित तंबाखूची वाहतूक करणारे वाहन देवरी तालुक्यातील भरेगाव फाट्यासम ोर रविवारी (दि.६) मध्यरात्री १:३० वाजता पकडण्यात आले. ही कारवाई देवरी पोलिसांनी केली असून या कारवाईत ६६ किलो सुगंधी तंबाखू व वाहन असा १४ लाख ५९ हजार ६२० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी गोवर्धन बिसन कुसराम (५०, रा. चितापूर, ता.जि. भंडारा) व सय्यद शिबान अहमद (रा. घर क्रमांक-१४३, वॉर्ड क्रमांक- १४, बलदेव बाग, राजनांदगाव) हे दोघे वाहनामध्ये (क्रमांक सीजी-०४, पीपी-८३४०) महाराष्ट्र १४ सरकारने प्रतिबंधित केलेली सुंगधित तंबाखू (माझा १०८) चे प्रत्येकी २०० ग्रॅम वजनाचे प्रत्येकी ९३५ असे एकूण ३६ टीन एकूण वजन ७.२ किलो, किंमत ३३ हजार ६६० रुपये, सुगंधित तंबाखूचे (तुलसी रॉयल जाफरानी जर्दा) प्रत्येकी २५.५ ग्रॅम वजनाचे प्रत्येकी ३४८ असे एकूण १५० पाकिटे एकूण वजन ३.८२५ किलो, किंमत ५२ हजार २०० रुपये, पान मसालाचे (पान पराग प्रीमियम) प्रत्येकी १० ग्रॅम वजनाचे प्रत्येकी १२० रुपये एकूण १९० पाकिटे, एकूण वजन १७.१ किलो, किंमत २२ हजार ८००, पान मसालाचे (प्रीमियम रंजनीगंधा) प्रत्येकी २०४ ग्रॅम वजनाचे प्रत्येकी किंमत ८४० असे एकूण ७० पाकिटे, एकूण वजन १४.२५ किलो, किंमत ५८ हजार ८०० रुपये, पान मसालाचे (प्रीमियम रंजनीगंधा) प्रत्येकी १२३.२ ग्रॅम वजनाचे प्रत्येकी ४८० असे एकूण १९२ पाकिटे,



एकूण वजन २३.६५४ किलो, किंमत ९२ हजार १६० रुपयांचा माल असा एकूण ६६.०४५ किलो, किंमत दोन लाख ५९ हजार ६२० रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

अन्नसुरक्षा अधिकारी महेश प्रभाकर चहांदे (४४) यांच्या तक्रारीवरून देवरी पोलिसांनी आरोपीं-वर भारतीय न्याय संहिता कलम २२३, २७४, २७५, १२३ सहकलम २६ (२) (आय), २६ (२), (आय व्ही), २७ (३), (ई), ३ (१) (झेड झेड) (व्ही) ५९ सुरक्षा व मानदे कायदाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तपास सहायक पोलिस निरीक्षक गंगाकचूर करीत आहेत.

### देवरी येथूनच होते जिल्ह्यात एंट्री

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बंदी असलेल्या तंबाखूची आवक होताना दिसत आहे. विशेष म्हणजे, ही सुगंधित तंबाखू बहुतांश वेळी छत्तीसगड राज्यातून आणला जात आहे. तर देवरी येथूनच हा सुगंधित तंबाखू जिल्ह्यात एंट्री केला जात असल्याचे आतापर्यंतच्या कारवायांतून दिसून आले आहे. या कारवाईतील तंबाखू राजनांदगाव येथून नागपूरला नेला जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**पर्यंत मिळाली कोठडी**

या प्रकरणात देवरी पोलिसांनी वाहनचालक गोवर्धन कुसराम याला अटक करण्यात आली आहे. तर त्याचा साथीदार सय्यद अहमद हा फरार आहे. पोलिसांनी सोमवारी (दि.७) गोवर्धनला न्यायालयात हजर केले असता त्याला - पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### महिला लोकशाही दिन २१ एप्रिलला

गोंदिया,: जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन साजरा करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी व अडीअडचणी ऐकून घेण्यासाठी २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनामध्ये सर्व महिला कर्मचारी, महिला मंडळ, बचतगट व इतर महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था येथील महिला थेट सभेमध्ये येवून वैयक्तीक तक्रार नोंदवू शकतात.

# महात्मा फुले कर्जमाफीतील वंचित शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम द्या

## शेतकऱ्यांची मागणी : परिणय फुके यांना दिले निवेदन



**नवेगावबांध :** महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जम ाफी योजनेत नियमित कर्जफ ेड करणाऱ्या परंतु प्रोत्सा-हनपर रकमेप-ासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांची प्रोत्साहन अनुदानाची रक्कम त्वरित देण्यात यावी अशी मागणी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था संघाच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे आ. परिणय फुके यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

संघाचे तालुकाध्यक्ष ललितकुमार बाळबुद्धे यांच्या नेतृत्वात दिलेल्या निवेदनातून महात्मा फुले कर्जमाफ ी योजनेत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा शासनाचा निर्णय होता. दोन याद्या प्रसिद्ध होऊन त्यातील शेतकऱ्यांना संबंधित रक्कम मिळाली, मात्र तिसरी यादी अद्याप प्रसिद्ध झालेली नाही. परिणामी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सुमारे ११३० तर जिल्ह्यातील ८८१० शेतकरी या लाभापासून वंचित आहेत. या संदर्भात मुख्यमंत्री, उपम ुख्यमंत्री, सहकारमंत्री व आयुक्त स्तरावर पाठपुरावा करूनही यावर कुठलाच मार्ग काढण्यात आला नाही. त्यामुळे तिसरी यादी प्रसिद्ध करून उर्वरित पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून केली. शिष्टमंडळात अण्णाजी डोंगरवार, रत्नाकर बोरकर, सचिव अरुण गजापुरे, हेमराज बेलखोडे, चंद्रकांत कावळे, किशोर बेलखोडे, नंदूजी कापगते, रामकृष्ण बनकर व शेतकऱ्यांचा समावेश होता.

# आपल्या भागात 'स्वप्नपूर्ती' सारखं व्यासपीठ असणं ही अभिमानाची गोष्ट

## विद्यार्थी आणि युवकांसाठी कार करणाऱ्या स्वप्नपूर्ती संस्थेच्या पाठीशी उभा राहणार

## 'मोती सन्मान आणि पारितोषिक वितरण' कार्यक्रमात आमदार नानाभाऊ पटोले यांचे प्रतिपादन

**लाखनी:-** भंडारा जिल्ह्यात स्वप्नपूर्ती बहुउद्देशीय संस्थेसारखा विद्यार्थी, युवकांसाठी काम करणारे एक व्यासपीठ आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या संस्थेला माझं पाठबळ हे कायम असेल असे प्रतिपादन आम दार नानाभाऊ पटोले यांनी केले. स्वप्नपूर्ती फाउंडेशनच्या वतीने मम ोती सन्मान आणि विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरणफ कार्यक्रम लाखनी येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला नानाभाऊ पटोले यांच्यासह खंडविकास अधिकारी धीरज पाटील, चेव्हनिंग शिष्यवृत्ती प्राप्त वकील दीपक चटप, जि. प. सदस्या डॉ. मनीषा निंबार्ते, किशोर वाघाये, संजय वनवे, संस्थेचे अध्यक्ष प्रशांत वाघाये, सचिव सुधीर काळे यांची प्रमुख होती. याप्रसंगी स्वप्नपूर्ती फाउंडेशनचा आजवरचा प्रवास विशद करणारी एक चित्रफीत आणि स्वप्नपूर्ती फाउंडेशनसोबत काम करणाऱ्या युवकांनी सुरू केलेल्या मइनसाईट जंक्शनफ या डिजिटल प्लॅटफफॉर्मचे विमोचन देखील यावेळी नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते पार पडले.



याप्रसंगी बोलताना नाना पटोले म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची मोठी गरज आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता हा विषय आपल्यामोर आहे. आजच्या विद्यार्थ्यांना, युवकांना तंत्रज्ञानासोबत जुळवून घेण्याची गरज आहे. उच्च शिक्षणाच्या माध्यम ातून नवे शिखरे गाठण्याची गरज आहे आणि या गोष्टींसाठी विविध उपक्रमांची गरज आहे. यासाठी स्वप्नपूर्ती संस्था काम करत आहे. त्यामुळे त्यांच्या कामाला मी मना-पासून शुभेच्छा देतो, असेही नाना पटोले म्हणाले.

याप्रसंगी बोलताना धीरज पाटील म्हणाले की, मी लाखनीत कार्यरत असताना मला स्वप्नपूर्ती संस्थेचे काम बघता आले. कॉलेज जीवनात विद्यार्थ्यांच्या मनात अशी संकल्पना येणे आणि त्यावर त्यांनी सलग काम करणे ही कल्पनाच मुळात मोठी आहे आणि ती त्यांनी साकारली. या अंतर्गत व्यक्तिमत्व विकास, भाषा व संभाषण कौशल्य, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, उच्च शिक्षण विषयक मार्गदर्शन, मोती सन्मान असे उपक्रम घेतले. हे उपक्रम काळाची गरज आहे. तर मनीषा निंबार्ते म्हणाल्या की, लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येण्यापूर्वीपासून मी या संस्थेचा भाग आहे. आपल्या भागातील मुलांना नवनवीन गोष्टी मिळाव्यात, यासाठी ही संस्था प्रयत्न करते. आजवर अनेक क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांना या संस्थेने विद्यार्थ्यांसोबत जोडून दिले. विद्यार्थ्यांना त्यांच्याशी संवाद साधता आला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात चांगली पिढी घडवणे हे काम करण्याची गरज असताना स्वप्नपूर्ती संस्था हे काम करत आहे. समाज म्हणून त्यांच्या कामाचा अभिमान आहे, असेही त्या म्हणाल्या.

संस्थेचे अध्यक्ष प्रशांत वाघाये यांनी प्रास्ताविक केले. यावेळी क्षमता विकास, व्यक्तिमत्व विकास, भाषा व संभाषण कौशल्य अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली आणि असे उपक्रम आगामी काळात राबविण्यात येतील. यासाठी विविध शाळा महाविद्यालय यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

चौकट- दीपक चटप यांची लंडनहुन खास उपस्थिती...

चेव्हनिंग स्कॉलर दीपक चटप यांची या कार्यक्रमाला लंडनहुन व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे विशेष उपस्थिती होती. ग्रामीण भागा-तील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ऊर्जा असताना माहितीच्या अभावामुळे दिशा मिळत नाही. हीच दरी भरून काढण्यासाठी स्वप्नपूर्ती संस्था काम करत आहे आणि या कामामध्ये लाखनी, साकोली परिसरात मलाही त्यांच्यासोबत सहभागी होता आले. आगामी काळात मोठ्या प्रमाणात विविध उपक्रम सोबत मिळून राबवूया. यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन यांचे सहकार्य लाभावे, असे आव-ाहनही त्यांनी केले.

चौकट- स्वप्नपूर्ती फ ाउंडेशनच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गुणीजनांना मोती सन्मान देऊन गौरविण्यात येते. यंदा मूळचे भंडारा जिल्ह्यातील असलेले आणि सध्या स्पेनमध्ये वास्तव्यास असलेले लेखक व चित्रपट निर्माते रोशन रोशन भोंडेकर, प्रो कबड्डीसह विविध राष्ट्रीय स्पर्धांच्या माध्यमातून भंडारा जिल्ह्याचे नाव क्रीडाविश्वात नावारूपास आणणारे आकाश पिकलमुंडे आणि स्पर्धा परिक्षांच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या विविध अडीअडचणींसाठी मार्गदर्शन करणारे, सामाजिक कार्यातही सक्रीय असलेले उमेश कोर्राम या ३ मान्यवरांना मोती सन्मान प्रदान करण्यात आला. तर छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त घेण्यात आलेल्या निबंध आणि चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण देखील याप्रसंगी पार पडला. यामध्ये निबंध स्पर्धेत सानू भाऊराव घोनमोडे, आरोही मनोज पिपरेवार, शर्वरी संजय खेडीकर यांना एका गटात तर विशाखा विनायक भुसारी, राजश्री एस. टेंभरे, लीना बबन कातोरे यांना अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात आले. चित्रकला स्पर्धेत हर्षा व्ही. निखाडे, अक्षरा टी. मिरासे, यादवी सी. गोस्वामी, पर्णवी के. मरस्कोले यांना तर दुसऱ्या गटात सृष्टी सुनील रोकडे, धनश्री डी. मेश्राम यांनाही प्रथम द्वितीय तृतीय पारितोषिक अनुक्रमे प्रदान करण्यात आले.

स्वप्नपूर्ती संस्थेच्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, नागरीक आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगेश बेहलपांडे यांनी केले तर मोती सन्मान आणि पारितोषिक प्रदान कार्यक्रमाबद्दल सुधीर काळे, विशाल हटवार यांनी माहिती दिली आणि लिखित पुडके यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निलेश राऊत, नितेश टिचकुले, आशिष राऊत, भीष्म लांडगे, अनिकेत नगरकर, दुर्गेश टिचकुले यांचे सहकार्य लाभले.

# ८३२ शिक्षकांचा गृह जिल्ह्यात परतण्याचा मार्ग झाला सुकर

**गोंदिया:-** बिंदूनामावली पोर्टलवर अपलोड न झाल्याने गेल्या अनेक वर्षापासून इतर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या शिक्षकांना गृह जिल्ह्यात परतण्याचा मार्गात अडचण निर्माण झाली होती. शिक्षकांनी सुद्धा यासाठी शिक्षण विभागाचे उंबरठे झिजविले, पण हा प्रश्न मार्गी लागला नव्हता. मात्र, जि. प. उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती सुरेश हर्षे यांनी हा मुद्दा लावून धरीत तो मार्गी लावल्याने ८३२ शिक्षकांचा गृहजिल्ह्यात परतण्याचा मार्ग सुकर झाल्याने अनेक वर्षानंतर दिलासा मिळाला आहे. जि. प. प्राथमिक शिक्षण विभागात शाळांची संख्या व त्या शाळांच्या पटसंख्येच्या आधारे जिल्ह्यात प्राथमिक शाळांमध्ये आवश्यक शिक्षकांची शिक्षक संख्या निश्चिती करण्यात आली आहे.

१०० टक्के बिंदू नामावली विभागाकडून शासनाच्या बदली पोर्टलवर आता अपलोड केली आहे. त्यामुळे कित्येक वर्षांपासून जिल्ह्याबाहेर नोकरी करीत असलेल्या प्राथमिक शिक्षकांना आपल्या गृह जिल्ह्यात येण्याचा मार्ग मोकळा झाला. जिल्ह्यात एकूण १०१४ प्राथमिक शाळा असून, त्यात ३५४७ शिक्षकांची पदे मंजूर असून, २७१५ पदे भरली आ-हेत, तर विविध संवर्गाची एकूण ८३२ पदे रिक्त आहेत. ही पदे शासनाच्या निकषानुसार भरण्याकरिता बिंदूनामावली पूर्ण असणे आवश्यक होती. ती अट पूर्ण करून शासनाच्या बदली पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे.

याकरिता गोंदिया जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती सुरेश हर्षे यांनी यांनी प्राथमिक विभागातील यंत्रणेला बिंदू नामावली पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानुसार विभागाने विहित मुदतीत आपली जबाबदारी पार पडून रोस्टर तयार केले. लगेच शासनाच्या बदली पोर्टलवर अपलोड केले आहे.



**बिंदूनामावली निश्चित होऊन रोस्टर तयार करून तो बदली पोर्टलवर अपलोड करण्यात आल्याने गेल्या अनेक वर्षापासून इतर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या ८३२ प्राथमिक शिक्षकांना गृहजिल्ह्यात परतण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे शिक्षकांच्या रिक्त पदांचा ब्लॅकलॉग भरून काढण्यास मदत होणार आहे.**
**सुरेश हर्षे, जि. प. उपाध्यक्ष गोंदिया**